सिंहाची चाल, गरुडाची नजर, स्त्रियांचा आदर, शत्रूचे गर्दन, असेच असावे मावळ्यांचे वर्तन, **हीच छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण...**

शिवजयंती

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews




संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# फेडेक्स कार्गो हबमुळे महाराष्ट्रातील व्यापाराला नवी गती : मुख्यमंत्री

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे भूमिपूजन

**नवी मुंबई (दै. संध्या)**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या समर्पित कार्गो हबचे भूमिपूजन हा भारत, मुंबई आणि महाराष्ट्रासाठी पुरवठा व्यवस्थापन खर्च क्षेत्रातील ऐतिहासिक टप्पा असून, या सुविधेमुळे राज्यातील उद्योग, निर्यात आणि व्यापाराला मोठी चालना मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. बदलत्या जागतिक व्यापार परिस्थितीत फेडेक्सने मुंबईत गुंतवणूक करण्याचा घेतलेला निर्णय हा भारताच्या आर्थिक सामर्थ्याचा आणि महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांवरील जागतिक विश्वासाचे महत्त्वपूर्ण प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या समर्पित कार्गो हबचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष विजय सिंघल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अदानी एअरपोर्ट होल्डिंग लि. चे संचालक




जीत अदानी, फेडेक्सचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी राज सुब्रमण्यम, फेडेक्स एमईआयएसच्या अध्यक्षा कामी विश्वनाथन, रिचर्ड स्मिथ, अरुण बंसल आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, फेडेक्सची जागतिक स्तरावरील मजबूत उपस्थिती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे महाराष्ट्रातील कार्गो हाताळणी आणि व्यापाराला मोठी चालना मिळेल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भविष्यात भारतातील सर्वोत्कृष्ट आणि सर्वाधिक व्यग्र प्रवासी व कार्गो विमानतळ ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

फेडेक्सतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे ३ लाख चौरस फूट क्षेत्रफळाचे अत्याधुनिक, पूर्णपणे स्वयंचलित एअर कार्गो हब उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी फेडेक्सकडून सुमारे २ हजार ५०० कोटीं रुपयांची दीर्घकालीन गुंतवणूक करण्यात येणार असून, हा हब भारतासाठी प्रादेशिक पुरवठा व्यवस्थान खर्चाचे केंद्र म्हणून विकसित होणार आहे. या सुविधेमुळे भारताचे दक्षिण-पूर्व आशिया, पश्चिम आशिया, युरोप आणि अमेरिका या प्रमुख जागतिक बाजारपेठांशी थेट व्यापार संपर्क अधिक मजबूत होणार आहे. हा कार्गो हब पुरवठा व्यवस्थान खर्च, वेअरहाऊसिंग, वाहतूक आणि संबंधित क्षेत्रांमध्ये ६ हजार हून अधिक थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करेल. अत्याधुनिक स्वयंचलित सॉर्टिंग सिस्टीम, डायमेन्शनल स्कॅनिंग, हाय-स्पीड स्क्रीनिंग तंत्रज्ञान आणि समर्पित विमान पार्किंग सुविधांमुळे इनबाउंड व आऊटबाउंड शिपमेंटची एकाचवेळी प्रक्रिया शक्य होणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स, अभियांत्रिकी उत्पादने, औषधनिर्मिती आणि नाशवंत वस्तूंसारख्या उच्च-मूल्य व वेळेवर आधारित क्षेत्रांना अधिक विश्वासार्ह आणि जलद सेवा मिळणार आहे. या सुविधेमुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना निर्यात-आयात क्षमतेत वाढ होऊन पुरवठा व्यवस्थान खर्च कमी होण्यास मदत होईल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील कार्गो क्षमता प्रारंभी सुमारे ०.५ दशलक्ष मेट्रिक टन वार्षिक राहणार असून, पुढील टप्प्यांत ती सुमारे ३.२५ दशलक्ष मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात येणार आहे.

# राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर कोणतीही चर्चा होणार नाही

**मुंबई (दै. संध्या)**

■ प्रफुल पटेलांची स्पष्ट भूमिका, रोहित पवारांच्या आरोपावर सावध प्रतिक्रिया

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना प्रफुल पटेल यांनी पूर्णविराम दिला आहे. "दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर कोणतीही चर्चा होणार नाही," असे स्पष्ट करत त्यांनी पक्षाच्या भविष्यातील नेतृत्वाबाबत मोठी घोषणा केली. आगामी २६ फेब्रुवारी रोजी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होईल, असे पटेल यांनी आज



माध्यमांशी बोलताना सांगितले. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढणे ही पक्षाची जबाबदारी असल्याचे पटेल यांनी नमूद केले. ते म्हणाले, "अजितदादांच्या निधनानंतर ही वेळ विलीनीकरणावर चर्चा करण्याची नाही. आज आमचा पक्ष स्वतंत्र आहे आणि आमची संघटनात्मक पदे किंवा विधिमंडळ नेतृत्वाची जागा भरण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. ती प्रक्रिया आम्ही पूर्ण करत आहोत."

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत बोलताना प्रफुल पटेल यांनी थेट विमान कंपनीला जबाबदार धरले आहे. "या दुर्दैवी घटनेत विमान कंपनीची जबाबदारी सर्वात मोठी आहे. पायलटकडून काही दुर्लक्ष झाले असेल, तर ते सीबीआयच्या (CBI) चौकशीत निश्चितपणे समोर येईल. मात्र, सकृतदर्शनी विमान कंपनी या दुर्घटनेला मोठ्या प्रमाणात जबाबदार असल्याचे मला वाटते," असे त्यांनी स्पष्ट केले.

अजित दादांचा अपघात होण्यापूर्वी पूर्व विदर्भातील एका नेत्याने त्यांना फोन केला होता, असा आरोप रोहित पवार यांनी केला होता. यावर प्रफुल पटेल यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "अजित पवारांच्या निधनाच्या आदल्या दिवशी मी त्यांना फोन केला होता. पण शेतकऱ्यांसाठी केला होता. कुणाची खासगी फाईल किंवा कुणाला मदत करण्यासाठी केला नाही. एक उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी त्या दिवशी माझ्या फोनसह अनेक लोकांचे फोन त्यांना आले असतील. अनेकांनी त्यांना वेगवेगळ्या कामांची निवेदने दिली असतील. याचा अर्थ मी कुठल्याही कारणाने त्यांना थांबवण्याचे काम केले असा होत नाही.

# ‘सबका साथ, सबका विकास’ केवळ दिखावा

**मुंबई (दै. संध्या)**

काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळात मुस्लीम समाजाला देण्यात आलेले ५ टक्के आरक्षण रद्द करून, जात प्रमाणपत्रांची प्रक्रियाही थांबवण्याच्या महायुती सरकारच्या निर्णयावर मुंबई काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. "हा निर्णय मुस्लीम समाजाच्या हक्कांवर गदा आणणारा असून, सरकारचा 'सबका साथ, सबका विकास' हा नारा केवळ एक राजकीय दिखावा असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे," अशा शब्दांत गायकवाड यांनी सरकारवर घणाघाती प्रहार केला.



महाराष्ट्र सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने १७ फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयावर वर्षा गायकवाड यांनी कडक टीका केली. त्या म्हणाल्या, "२०१४ मध्ये मुस्लीम समाजाला शैक्षणिक आणि नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण जाहीर करण्यात आले होते. मात्र, त्याबाबत सकारात्मक पाऊल उचलण्याऐवजी, सरकारने मुस्लीम समाजातील विशेष मागास प्रवर्गासाठीची (SBC-A) जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रक्रियाच रद्द करून टाकली आहे. हा निर्णय अत्यंत दुर्दैवी असून आम्ही याचा तीव्र निषेध करतो." "एकीकडे विकासाच्या गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे आरक्षणासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे मिळवण्याचे मार्गच बंद करायचे, हा सरकारचा शुद्ध दुटप्पीपणा आहे," असा आरोप वर्षा गायकवाड यांनी केला. उच्च न्यायालयाने मुस्लीम समाजाला शिक्षण क्षेत्रात ५ टक्के आरक्षण देण्यास मान्यता दिली असतानाही, त्याची अंमलबजावणी न करणे हे लोकशाहीसाठी घातक असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान

मुंबई (दै. संध्या) : देशातील १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ रिक्त होणाऱ्या जागांसाठी भारतीय निवडणूक आयोगाने निवडणुकीचे बिगुल वाजवले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक ७ जागांचा समावेश असून, या जागांसाठी येत्या १६ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. एप्रिल २०२६ मध्ये अनेक दिग्गज सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्याने ही निवडणूक राजकीयदृष्ट्या अत्यंत चुरशीची ठरणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ मार्च असून ६ मार्च रोजी अर्जांची छाननी होईल.

# महापालिका निकालानंतर प्रथमच राज–शिंदे भेट; केडीएमसी पाठिंब्यावर पुन्हा चर्चा

मुंबई (दै. संध्या) : महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर प्रथमच राज ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकत्र आल्याचे दिसून आले. राज ठाकरे यांनी ठाण्यातील ‘नंदनवन’ बंगल्यावर जाऊन शिंदे यांची भेट घेतली. सुमारे २० ते २५ मिनिटे दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

शिवसेना पक्षातील फुटीनंतर मुख्यमंत्री बनलेल्या शिंदेंची राज ठाकरे यांनी यापूर्वी भेट घेऊन अभिनंदन केले होते. त्यानंतरही दोघांमध्ये वेळोवेळी भेटी झाल्या. लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ ठाण्यात सभा घेतली होती. मात्र, महापालिका निवडणुकांमध्ये दोन्ही नेते एकमेकांविरुद्ध मैदानात उतरले होते. तरीही राज ठाकरे यांनी शिंदे यांच्यावर थेट टीका टाळल्याचे दिसून आले.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत शिंदे यांच्या शिवसेनेने सर्वाधिक जागा जिंकल्या. मनसेला अपेक्षित यश मिळाले नाही. मात्र, महापौर निवडीवेळी मनसेच्या नगरसेवकांनी शिंदे गटाला पाठिंबा दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. शिवसेना विरुद्ध शिवसेना असा संघर्ष असताना, मनसेचा हा पाठिंबा चर्चेचा विषय ठरला होता.

सूत्रांच्या माहितीनुसार, मनसेच्या पाठिंब्याबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी राज ठाकरे यांचे आभार मानले. तसेच, महापालिका सभागृहातील कामकाजात मनसेचे सहकार्य राहील, असे आश्वासन राज ठाकरे यांनी दिल्याचे बोलले जाते. त्यामुळे या भेटीत केडीएमसीसह इतर राजकीय घडामोडींवरही चर्चा झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, या भेटीवर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली. “एकनाथ शिंदे आमचे विरोधी नेते असले तरी ते राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. तसेच राज ठाकरे मनसेचे प्रमुख आहेत. त्यामुळे त्यांनी कोणाला भेटावे किंवा न भेटावे, यावर आम्ही भाष्य करू शकत नाही. या भेटीत आक्षेपार्ह असे काही नाही,” असे त्या म्हणाल्या. महापालिका निवडणुकांनंतर राज–शिंदे भेटीमुळे राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.


# रोहित पवारांनी हे धंदे बंद करावे : राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर (दै. संध्या)**

अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या दुर्दैवी घटनेवरून सुरू असलेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांवर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. कुटुंबियांना मोठे दुःख झाले असताना अशा घटनेचे राजकारण करणे म्हणजे सरणावर पोळी भाजण्याचा प्रकार आहे. रोहित पवारांनी आरोपांचे धंदे आता तरी बंद करावेत, अशा कडक शब्दांत विखे पाटलांनी विरोधकांना सुनावले. विखे पाटील यांनी स्पष्ट केले की, अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत 'डीजीसीए'ला (DGCA) पत्र देऊन संपूर्ण चौकशीची विनंती करण्यात आली आहे. या प्रकरणात राजकारण करण्याचा प्रयत्न



दुर्दैवी असून, चौकशीतून सर्व तथ्ये समोर येतीलच. मात्र, दुःखाच्या काळात आधार देण्याऐवजी काही लोक जाणीवपूर्वक बुद्धीभेद करत असल्याची टीका त्यांनी केली. मुस्लीम आरक्षणाबाबत बोलताना विखे पाटील म्हणाले की, हे आरक्षण रद्द करण्याची कोणतीही विशेष भूमिका सरकारची नव्हती. उच्च न्यायालयाने दिलेला विशिष्ट कालावधी संपल्यानंतर ते तांत्रिकदृष्ट्या आपोआप रद्द झाले आहे. इतर राज्यांमध्येही हे आरक्षण टिकले नसल्याचे त्यांनी यावेळी निदर्शनास आणून दिले. मनोज जरांगे पाटील यांनी हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यावर विखे पाटील म्हणाले, जरांगे पाटील यांच्या भावनेचा आम्ही आदर करतो. आतापर्यंत 1.5 लाख कुणबी दाखले देण्यात आले आहेत. मात्र, संभाजीनगर विभागातील काही अधिकारी किंवा समिती सदस्य कामात सहकार्य करत नसल्याच्या तक्रारी आहेत. जर आता दिलेल्या अंतिम सूचनांनंतरही कामात बदल झाला नाही, तर संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर पावले उचलावी लागतील, असा इशारा त्यांनी दिला आहे तर सरकारची भूमिका काही वेगळी नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय

# मोदी म्हणाले, अजून पंचवीस बाकी!'


पंचाहत्तरी गाठली म्हणजे आता निवृत्ती आणि निरोपाचा कार्यक्रम असा विचार जर कोणी केला असेल तर त्याच्यासाठी गेल्या सप्ताहात दोन वेगवेगळ्या कार्यक्रमांत एकच खुलासा समोर ठेवण्यात आला. पहिला कार्यक्रम दिल्लीत होता आणि दुसरा मुंबईत. ७ फेब्रुवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात वृद्धत्वावर सहज बोलून गेले. आपल्या ७५व्या वाढदिवशी एक नेते भेटले आणि त्यांनी चिमटा काढला. 'अच्छा, तुम्ही आता पंचाहत्तरी ओलांडली तर..!' मोदींनी त्यावर दिलेला प्रतिसाद नेहमीप्रमाणे टाळ्या घेणारा तर होताच आणि त्यामागचा इरादाही अगदी सुस्पष्ट होता. "अजून २५ बाकी आहेत..." असे ते म्हणाले.

कदाचित हा केवळ विनोद असेल. भारतीय राजकारणात मात्र त्याची बातमी होते. निवृत्तीचे निकष आणि नेतृत्वबदल या विषयावर कुजबुज चालू असताना "निवृत्तीची भाषणे लिहायला इतक्यात सुरुवात करू नका," हा मोदींचा फटका स्पष्ट संदेश देणारा होता. यालाच जोडून ८ फेब्रुवारीला दुसरा प्रसंग मुंबईत घडला. सरसंघचालक मोहन भागवत यांनी वय आणि अधिकारपद याविषयी त्यांचे मत मांडले. "पंचाहत्तरीनंतर कोणीही पदावर न राहता काम केले पाहिजे हे मला ठाऊक आहे; परंतु, संघानेच मला पदावर कायम राहायला सांगितले आहे आणि जेव्हा संघ आदेश देईल तेव्हा मी पायउतार होईन." निवडणूक नाही, प्रचार नाही, केवळ नेमणूक, शिस्त आणि आदेश! दोन दिवस, दोन नेते. एकच वय आणि विशेष म्हणजे संदेश सारखाच! पंचाहत्तर हा भले एक आकडा असेल; परंतु, बाहेर जाण्याचा दरवाजा स्वयंचलित नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी हसत-हसत म्हणाले, "अजून २५ वर्षे बाकी आहेत..." उपस्थितही हसले. कॅमेरे पुढे सरसावले. परंतु, बरीच गर्दी असलेल्या भाजपच्या प्रतीक्षागृहात ताटकळलेल्या महत्त्वाकांक्षी नेत्यांना मात्र या हास्याने गोठवून टाकले. कारण, राजकारणात विनोदाकडेही 'अप्रत्यक्षपणे केलेली घोषणा' म्हणूनच पाहिले जाते. मागील काही वर्षांपासून दिल्लीच्या भगव्या वर्तुळात ज्येष्ठ नेते सरता काळ मोजत आहेत. तरुण चेहऱ्यांची तयारी चाललेली असते. काहींनी संयम ठेवून वाट पाहिली, काहींचा उतावीळपणा दिसला. त्यातच मोदींचे हे नवे ७५-२५ चे गणित आले. विशेष म्हणजे २०४७ हेच ते वर्ष ज्याचा उल्लेख मोदी 'विकसित भारताचे गंतव्य' म्हणून वारंवार करीत असतात. अचानक या घोषणेला एक वेगळी धार आली. - सहेतुक वा अहेतुक कसाही असला तरी संदेश स्पष्ट आहे : मोदींनंतरच्या कालखंडाचा विचार इतक्यात सुरू करू नका. राहुल गांधी यांनी संसदेत प्रकाशझोत आपल्यावर ठेवला यात काही शंका नाही. यापूर्वी फार थोड्या विरोधी पक्षनेत्यांना हे जमले होते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात सत्तारूढ बाकांना वाटत होते की राहुल त्यांची नेहमीची भूमिका बजावतील. म्हणजे निषेध, थोडे थांबून पुन्हा मागे जाणे वगैरे.. तर राहुल गांधी यांनी वेगळेच काहीतरी केले. एक प्रकारे त्यांनी सभागृह, कॅमेरे आणि सत्तारूढ बाजूला 'आता मला अडवून पाहा' असे आव्हानच दिले. त्यांनी केवळ सरकारवर हल्ला चढवला नाही, तर दूरचित्रवाणी वाहिन्यांवर ते चालून गेले याचा अनेकांना अचंबा वाटला. राहुल गांधी आता 'माझे ऐकून घ्या' अशी विनवणी करणारे नेते राहिलेले नाहीत. कितीही थट्टा करा, अडथळे आणा, व्यक्तिगत हल्ले चढवा, हक्कभंग किंवा इतर ठराव आणा; आता त्यांना कशाची फिकीर नाही. सत्तारूढ बाकांनी कार्यपद्धतीतल्या तांत्रिक बाबी, तत्काळ प्रत्युत्तर, आक्रमक प्रतिहल्ले असे सगळे मार्ग अवलंबून राहुल गांधी यांना जेरीस आणण्याचा प्रयत्न केला. परंतु, ते डगमगले नाहीत. गोंधळातही त्यांनी पुढे पावले टाकली. चर्चेमागून चर्चा झाल्या. मात्र, धोरणात्मक बाबींच्या पुढे जाऊन त्यांनी काहीतरी सांगण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आपल्याला गप्प केले गेले, कमी लेखले, बाजूला सारले, मात्र आता नम्रपणे वाट पाहण्याचा काळ संपला आहे. आता थांबणे नाही. सतत पुढे जात राहणे असा त्यांचा नूर दिसला. राजकारणात फारसे स्वारस्य नसलेला नेता ही प्रतिमा बदलायला त्यांनी सुरुवात केली आहे.

## संस्कृत सुभाषित

यस्य न ज्ञायते शीलं कुलं विद्या नरस्यच।
कस्तेन सह विश्वासं पुमान्कुर्याद्विचक्षण:।।
अर्थ : ज्या माणसाचे कुल, शिक्षण आणि वर्तन माहीत नसते त्याच्यावर कोणता सूज्ञ माणूस विश्वास ठेवील बरे?

## गुरु वचन



### दु:खावर विजय मिळवा

सिद्धार्थ नावाचा राजकुमार होता. त्याला जीवनात काहीच कमी नव्हते. तो सुंदर, सुदृढ व सद्गृहस्थ होता. त्याला कुठलेही शारीरिक किंवा मानसिक कष्ट नव्हते. त्याच्यापुढे सुख–समृद्धी हात जोडून उभी होती. त्याची पत्नी यशोधरा ही सुंदर, सुदृढ व पतीव्रता होती. त्याचा मुलगा राहुल सुद्धा मनमोहक व सुदृढ होता. सर्व काही होऊनही सिद्धार्थ दु:खाच्या अनुभूतीने पिडीत राहत होता.

खरं म्हणजे जन्मानंतर माणूस कुठल्यातरी शारीरिक किंवा मानसिक दु:खाने पिडीत असतो. दु:खांना पाहून व अनुभवूनच सिद्धार्थ बुद्धात रूपांतरित झाले. अभावावाचे कारण आपण अभावासच दु:खाचे कारण मानतो. जगातील बहुतेक श्रीमंत लोक दु:खी व असमाधानी आहेत. एखादी वस्तु किंवा व्यक्तीचा अभावच त्यांना दु:खी करतो. काही लोकांकडे पैशांची कमी नाही पण ते शारीरिक दु:खाने पिडीत आहेत.

काही लोक काम, क्रोध, ईर्ष्या, द्वेष, मोह सारख्या मानसिक दु:खांनी ग्रस्त असतात. तसेच काही लोक अज्ञानामुळे दु:खी आहेत. जर काही लोकांना दु:ख नसेल तर त्यांच्यासाठी जन्म–मृत्यूचे दु:खच काय कमी आहे? विजय म्हणजे लक्ष्य.जगात सुखाचे काही क्षण असतात. याचे प्रमाण आपणास लोकांचे हसणे, बोलणे, गाणे, खेळण्यात व आनंद साजरा करण्यात मिळू शकते. काही लोक थट्टा–मस्करी करताना दिसतात पण हे सर्व सुख क्षणभंगुर व तात्पुरते आहे. हा सर्व खटाटोप दु:खातून वाट काढण्याचा उपक्रम आहे. जर दु:खास जीवनाचा एक भाग मानले तर आपण याचाच विचार करून आपण आपले बहुमूल्य जीवन नष्ट केले पाहिजे? नाही, आपले लक्ष्य दु:खांवर विजय मिळवणे आहे. हाच आमचा पुरुषार्थ आहे. जगास दु:खालय मानून तडफडत मरणे मानवाचा लज्जास्पद पराभव आहे. त्याने जगास परीक्षा–स्थळ मानत दु:ख–सागरास ओलांडण्याचा उपाय शोधला पाहिजे. यामुळे त्यास सुख व शांतता लाभेल. जिथे रोग आहेत, तिथे उपचार आहे, जिथे अडचणी आहेत, तिथे त्यातून निघण्याचा मार्ग उपलब्ध आहे. फक्त आपल्या हृदयात खरी जिज्ञासा असण्याची गरज आहे. तसेच आपल्या लक्ष्याप्रती निष्ठावान व साहसी बनावे. विचारवंत मानतात की, मानवाची विषय तृष्णाच सर्व दु:खांचे मूळ आहे. जर ते तृष्णाच्या मृग–मरीचिकात फसण्यात स्वत:ला वाचवू शकले तर निश्चितपणे त्यांना कुठलेच दु:ख असणार नाही.

आपणास समोर जे दिसते, मनात तेच मिळण्याची इच्छा असते. जे आपल्याकडे आहे, त्यापेक्षा जास्त मिळवण्याची इच्छा करणेच तृष्णा आहे, जी कधीच पुर्ण होत नाही. जे आपल्याकडे आहे, त्यात समाधान मानून जर जास्तीत जास्त मिळवण्याची अनावश्यक इच्छा सोडली तर सर्व दु:ख टाळले जाऊ शकतात.

जगातील सर्व वस्त नश्वर आहेत. जर व्यक्तीने ही गोष्ट मनात आत्मसात केली तर जगातील कुठलेच दु:ख त्यास विचलित करु शकत नाही. भगवान बुद्धांनुसार, दु:ख निवृत्तीतून निर्वाणीत आहे. स्वत:ला राग–द्वेषातून मुक्त करणेच निर्वाण आहे, ज्यास थोड्या प्रयत्नातून मनुष्य आपल्या जीवनातच मिळू शकते.

## पंचांग

| पंचांग | करण:तैतिल |
|---|---|
| १९ फेब्रुवारी २०२५ | २७:२१:१४+ |
| गुरूवार | सूर्य:कुम्भ |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:मीन१४:५९:४२ |
| फाल्गुन शके | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्– १९४७ | मुस्लिम मास – रमजान |
| संवत्सर – विश्वावसूनाम | तारीख – १ |
| अयन– उत्तरायणारंभ | विशेष |
| मास– फाल्गुन | गोपाळकृष्ण गोखले |
| ऋतु– सौर शिशिर | पुण्यतिथी |
| शुक्ल पक्ष | मुस्लिम रमजान मासारंभ |
| तिथि:द्वितीया १५:५८:५९ | छत्रपती शिवाजी महाराज |
| नक्षत्र:पूर्वाभाद्रपद | जयंती (तारेखप्रमाणे) |
| २०:५१:३५ | रामकृष्ण जयंती |
| योग:सिद्ध २०:४१:५२ | दादाजी महाराज साल्पेकर |
| करण:कौलव १५:५८:५९ | पुण्यतिथी – नागपूर |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 2 | | 7 | | | 4 |
| 4 | | | | 3 | | 5 | | 2 |
| | | 2 | | 6 | 5 | | 8 | |
| | 6 | 8 | | | | | 4 | |
| | | | 3 | 4 | 6 | | | |
| | 5 | | | | | 9 | 3 | |
| | 1 | | 5 | 7 | | 3 | | |
| 5 | | 7 | | 8 | | | | 9 |
| 6 | | | 9 | | 1 | | 7 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 6 | 2 | 5 | 4 | 8 | 3 | 9 |
| 4 | 9 | 5 | 3 | 6 | 8 | 1 | 2 | 7 |
| 8 | 2 | 3 | 7 | 9 | 1 | 6 | 4 | 5 |
| 5 | 7 | 1 | 4 | 2 | 3 | 9 | 8 | 6 |
| 3 | 6 | 8 | 9 | 7 | 5 | 4 | 1 | 2 |
| 9 | 4 | 2 | 8 | 1 | 6 | 5 | 7 | 3 |
| 2 | 8 | 7 | 5 | 4 | 9 | 3 | 6 | 1 |
| 6 | 5 | 4 | 1 | 3 | 2 | 7 | 9 | 8 |
| 1 | 3 | 9 | 6 | 8 | 7 | 2 | 5 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९७ – लुग्डुनुमच्या युद्धात रोमन सम्राट सेप्टिमियस सेव्हेरस कडून क्लोडियस अल्बिनसचा पराभव.
- ६०७ – बॉनिफेस तिसरा पोपपदी.
- २००८ – ग्लोबल फायनानशियल सेवा फर्म सिटीला आशियात २००७ मध्ये सर्वोत्कृष्ट बँकेचा दर्जा देण्यात आला. एसेट नियतकालिकाने सलग आठव्या वर्षी बँकेला हा सन्मान दिला.

### राष्ट्रीय

- २००७ – समझौता एक्सप्रेसच्या दोन डब्यात बॉम्ब स्फोट; ६६ प्रवाशी ठार.
- २००८ – बिहार–नेपाळ सीमेवर जवळपास २३ कोटी रुपये किंमतीचे यूरेनियम हस्तगत करण्यात आले.

### जन्म

- १६३० – छत्रपति शिवाजी महाराज यांचा जन्म.
- १४७३ – कोपर्निकस यांचा जन्म.
- १६८३ – फिलीप व्ही., स्पेनचे राजा यांचा जन्म.
- १८९९– बळवंतराय मेहता, गुजरातचे दुसरे मुख्यमंत्री यांचा जन्म.

### निधन

- १८१५ – गोपाल कृष्ण गोखले, भारतीय नेते यांचे निधन.
- १९९० – मायकल पॉवेल, इंग्रीजी चित्रपटाचे दिग्दर्शक यांचे निधन.
- १९९५ – इयन बाल, छायाचित्रकारचे निधन.
- २००८ – बसवराजेश्वरी, पी. व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळातील महिला आणि बाल कल्याण राज्यमंत्री यांचे निधन.

## : SMS :

Whats self insult ?
An Angry Boss- Tumne Kabhi Ullu Dekha Hai ?
Employee(Sar juka Ke)-Nahi Sir!!
Boss-Neeche Kya Dekh Rahe Ho Idiot?
Meri Taraf Dekh..!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९ | १९.७ |
| अहमदनगर | २८.७ | २०.९ |
| अकोला | ३१.८ | १८.९ |
| अमरावती | ३०.९ | १७.९ |
| बीड | ३२.२ | १८.२ |
| भंडारा | ३१.४ | १४.५ |
| बुलढाणा | २७.५ | १२.६ |
| चंद्रपूर | ३२.१ | १७.९ |
| चेन्नई | ३०.२ | २३.४ |
| नवी दिल्ली | २८.३ | १५ |
| धुळे | ३१.९ | १९.६ |
| गोंदिया | ३०.२ | १६.५ |
| जळगाव | ३०.८ | १८.७ |
| कोल्हापूर | २९.९ | १७.८ |
| लातूर | २९.६ | २० |
| मुंबई | ३०.४ | २३.७ |
| नागपूर | ३०.४ | १७.६ |
| नांदेड | ३१.५ | १९.९ |
| नंदूरबार | २९.७ | १९.७ |
| नाशिक | ३०.१ | १७.५ |
| पुणे | २९.६ | १८ |
| पंढरपूर | ३०.३ | १९.२ |
| सातारा | ३०.४ | १३.४ |
| सांगली | ३०.८ | १७.९ |
| सोलापूर | ३०.७ | २०.८ |
| वर्धा | ३१.९ | १५.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण सामाजिक कामात रस घ्याल. भावाच्या मदतीमुळे व्यवसायात फायदा होईल.

**तुळ :** शुभ रंग :केसरी, शुभ दिशा: पश्चिम कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. बुद्धी चातुर्यामुळे आर्थिक स्थितीत वृद्धी होईल.

**वृषभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण साहस व पराक्रमात वाढ होईल. एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीशी संबध येतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम नौकरीत बढतीचे योग आहेत. कौटुंबिक जिवन आनंदी राहील.

**मिथुन :** शुभ रंग: लाल: शुभ दिशा: पूर्व व्यवहारात स्पष्टपणा दाखवा. प्रवास शक्यतो आज टाळा. मानसिक त्रास राहणार आहे.

**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम सावधानी बाळगा. वातावरण अनकूल जरी असले तरी आपले काम पूर्ण हेणार नाही.

**कर्क :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व व्यापारात स्व:ताच्या मताने काम करा. स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा योग आहे.

**मकर :** शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पूर्व अपूर्ण राहिलेले काम वेळेवर पूर्ण होतील. थोडे प्रयत्न केल्याने फायद्याचे मार्ग मोकले होतील.


**सिंह :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम कामामध्ये कुटुंबातील सदस्याची मदत मिळाल्याने उत्साह वाढणार आहे. आरोग्य चांगले राहील.

**कुंभ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पूर्व विचारपूर्वक केलेल्या कामात फायदा होईल. राजकीय क्षेत्रात किंवा व्यवसायातील निर्णय फायदेशीर राहतील.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राही.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण श्रमाच्या कामात यश मिळेल. नवीन संबंध भविष्यात फायदेशीर असतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६३



### आडवे शब्द

१. अनुभवाशिवाय ज्ञान नाही या अर्थाची म्हण
६. सासऱ्याच्या घरीच कायमचा मुक्काम ठोकणारा
१०. माराची खूण
११. लोखंड घासण्याचे हत्यार
१२. सर्प
१३. पशुरूपी संपत्ती
१५. डावखोरा
१७. नेहमी
१८. कान स्वच्छ करण्याचे साधन
२०. देवळाची पहिली पायरी
२२. अतिभव्य
२३. कापडाचा तागा
२४. पडीक जमीन
२५. जळण्याचा वास
२६. मेहरबानी
२९. जड वस्तू नेण्यासाठी वापरावयाचे बांबूचे साधन
३०. भरपूर, खूप प्रमाणात
३३. चेहऱ्यावरील तेज
३४. क्षण (हिंदी)
३५. पत्त्यातील आठ
३६. याठिकाणी नक्षीकामामुळे साडीला वजन येते
३८. लग्नाचे वेळी वरात आणणारा वधूचा भाऊ
४०. सवय, राबता
४२. छोटे कुबड
४३. नखापाशी झालेला रोग
४५. मुलांचा फळीवरुन घसरण्याचा खेळ
४९. आगबोट
५१. खोपोलीजवळचा वृद्धाश्रम
५१अ. धाव (इंग्रजी)
५२. शाहरुख खलनायकाच्या भूमिकेत
५३. सुखद थंडावा
५५. वर्तमानपत्रातील कप्पा
५७. एक बारीक धान्य
५९. नाशिकहून मुंबईला उतरणारा घाट
६०. च्या बरोबर
६२. किल्याभोवतीची भिंत
६५. एकलकोंडा
६७. फळा–फुलाचा झाडाला जोडणारा भाग
६९. मांडणी
७०. श्रीमंत
७२. एकमेकांचे वर्म काढणे, नावे ठेवणे
७४. अविवाहित
७५. वारा
७७. सगळे (हिंदी)
७९. आहार असा असावा
८१. दीनवाणा
८४. त्रिदलांचा एक वृक्ष
८६. संगीतसम्राट
८८. '---- उघड दार देवा आता, उघड दार देवा'
९१. सरळ लांब वासा
९२अ. तडाखा
९३. निष्णात, तरबेज
९५. खोबऱ्याची बर्फी
९६. आंतरिक इच्छा
९७. अनुपम

### उभे शब्द

१. चेष्टेत दहावा ग्रह
२. समय, अवधी
३. नमस्कार
४. रंग बदलणारे फूल
५. ओला आणि सुका वेगळा करावा!
६. गर्द (रान)
७. द्रव, पाझर
८. भार, बोजा
९. डोळ्यावरचा उघडझाप होणारा अवयव
११. बैलाच्या शिंगाचा दोर
१२. मोदकामध्ये भरलेले
१३. गाईंना सांभाळणारा
१४. संपत्ती
१६. सामिष पदार्थांसाठी ग्रामीण बोलीतील शब्द
१८. अगदी नुकतेच सरलेले दिवस
१९. धान्यघर
२०. विवाहविच्छेद
२१. शाब्दिक हजामत
२२. उशीर
२५. या फळात अमृतबीज असते असे शिवफक्त मानतात
२७. शरीर
२८. चिक्कूसाठी प्रसिद्ध गाव
२९. चुलता
३१. चटकन, त्वरित
३२. हात
३४. ऐसपैस, विखरून
३५. सोपे नसलेले
३७. रत्नमाला
३९. लगबग, धांदल
४१. काळजी, चिंता
४४. कोवळ्या दुधाचा पदार्थ
४६. न उचलता दुसऱ्या जागी हलवणे
४७. फसवून पळून जाणे
४८. अंकुर
५०. जकात घेण्याची जागा
५४. गंध
५६. अपशकुन
५७. जसे काही
५८. सांकेतिक चिन्ह
६१. पराजित होणे
६३. मराठीत बांधून ठेवणारे, हिंदीत बांधून ठेवलेला
६४. केविलवाणा
६५. प्रतिष्ठा, सन्मान
६६. डोसा, आंबोळी
६८. चोरावर मोर
७१. प्रहार, घाव
७२. शिसारी, अतिशय कंटाळा
७३. दोन नदीप्रवाहांमधील जमिनीचा भाग
७३अ. शैली, ढंग
७५. गुंतवणुकीवरील मोबदला
७६. वस्त्र, कापड
७८. ढगाळ वातावरण
८०. कर्णेंद्रिय
८२. पद्धतीनुसार
८३. खूप, पुष्कळ
८४. तपासनीस
८५. जबरदस्ती
८५अ. लघळ
८७. सेनानी, सेनानायक
८९. समर्थ स्थापित अकरा मारुतींपैकी एक
९०. मक्ता
९२. एक ज्वालाग्राही पदार्थ
९४. खूळ, लहर

### जम्बो शब्दकोडे क्र. ८६३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.मधुकर ४.जनावर ७.विसरभोळा १०.पामर १२.वासा १५.ललाट १७.मामा १९.मनाई २०.सवड २१.दमा २२.वर २३.बाजरी २४.परवा २६.माहेरवाशीण २८.सजा २९.मशाल ३२.अजगर ३५.जल ३६.हालचाल ३९.वग ४०.तडक ४१.पपनस ४२अ.दाम ४३.कवच ४४.रद ४५.रखवालदारी ४८.मला ४९.चुचकारणे ५०.सलग ५१.सखी ५२.मुख ५३.परत परत ५७.सखा ६०.थट्टामस्करी ६१.जनक ६३.पाव ६५.क्षमायाचक ६७.बालगीत ७०.रौप्यपदक ७३.आंबट ७४.रुसवा ७५.साक्ष ७६.बाकीबाब ७७.कारण

उभे उत्तर : १.मजल दर मजल २.कपाट ३.रम ५.नाका ६.रवाना ८.सरासरी ९.भोकाड पसरणे ११.रमावर १३.साईबाबा १४.कडवा १६.लामा १८.मारवा १९.मरण २५.रजा २६.माल २७.शीतल ३१.टोपपदर ३२.अवसर ३३.जग ३४.खरमरीत ३६.हातचलाखी ३७.लड ३८.चाकरचुकर ४१.परका ४२.सवाल ४२अ.दादा ४३.कला ४६.खसखस ४७.लगत ४८.मनोरथ ५१.सकाम ५३.परीक्षक ५४.तनया ५५.रजक ५६.तन ५८.खाजगी ५९.कृपा ६२.कबाब ६४.वहिवाट ६६.चमकी ६८.लटका ६९.तरुण ७०.रौप्य ७१.पसा ७२.दक्ष ७३.आंब

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### मॉरिशसमध्ये होणार मराठी अस्मितेचा जागतिक जयघोष

■ आंतरराष्ट्रीय सांगीतिक-सांस्कृतिक सोहळा "मोगरा फुलला" – अभिमानाचा उत्सव

पुणे (दैनिक संध्या) : जगभरातील मराठी भाषिकांकडून दरवर्षी मराठी भाषा दिन अभिमानाने साजरा केला जातो. केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हा अभिमान अधिकच वृद्धिंगत झाला आहे. या ऐतिहासिक गौरवाचा विस्तार आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्याच्या उद्देशाने मॉरिशस येथे २७ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२६ या कालावधीत "मोगरा फुलला" या भव्य आंतरराष्ट्रीय सांगीतिक व सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मॉरिशसमधील प्रतिष्ठित सर्ज कॉन्स्टँटिन थिएटर येथे पार पडणार असून, याबाबतची माहिती स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाउंडेशन चे अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रबोधन परिवाराच्या सन्मिता धापटे-शिंदे, गणेश शिंदे, फाउंडेशनचे सचिव प्रसादराजे भोपळे आदि मान्यवर उपस्थित होते. हा सोहळा स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाउंडेशन आणि प्रबोधन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय व मॉरिशस कला व सांस्कृतिक मंत्रालय यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. यासोबतच मॉरिशस मराठी कल्चरल सेंटर ट्रस्ट, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन, मॉरिशस मराठी स्पीकिंग युनियन आणि क्रॉसवेज इंटरनॅशनल यांचे सक्रिय सहकार्य लाभले आहे. यंदाचे वर्ष संतपरंपरेचे अध्वर्यू संत ज्ञानेश्वर यांच्या ७५० व्या जयंती वर्षाचे आहे. त्या औचित्याने हा संपूर्ण सोहळा त्यांच्या जीवनकार्य, तत्त्वज्ञान आणि मानवतावादी विचारांवर आधारित आहे. मराठी भाषा, अध्यात्म आणि संस्कृती यांचा संगम साधणारा हा उपक्रम जागतिक मराठी उत्सव म्हणून साकारत आहे. "मोगरा फुलला" हा कार्यक्रम गणेश शिंदे आणि सन्मिता धापटे-शिंदे तर शुभांगी शिंदे 'मी महाराष्ट्र बोलतोय' यावर स्वगत सादर करणार आहेत. असे कांबळे यांनी सांगितले. या कार्यक्रमाला मॉरिशस प्रजासत्ताकाचे उपराष्ट्रपती जीन रॉबर्ट इवान हंगली, कला व सांस्कृतिक कार्य मंत्री महेंद्र गोंदिया तसेच महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मॉरिशसमध्ये वास्तव्यास असलेल्या मोठ्या मराठी डायस्पोरा समुदायाला मातृभूमीतील आध्यात्मिक, साहित्यिक व सांस्कृतिक वारशाशी पुन्हा जोडणारे प्रभावी व्यासपीठ म्हणून "मोगरा फुलला"कडे पाहिले जात आहे. प्रबोधन परिवाराच्या सन्मिता धापटे-शिंदे म्हणाल्या, "'मोगरा फुलला' हा केवळ सांगीतिक कार्यक्रम नसून मराठी अस्मिता, अध्यात्म आणि सांस्कृतिक वारशाचा जागतिक उत्सव आहे. मॉरिशसच्या भूमीवर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सुगंध दरवळविणारा हा उपक्रम दोन्ही देशांतील सांस्कृतिक बंध अधिक घट्ट करेल." प्रसादराजे भोपळे यांनी सांगितले की, "'मोगरा फुलला'चा हा पहिला आंतरराष्ट्रीय प्रयोग मॉरिशसमध्ये होत असून, पुढील टप्प्यात पॅरिस (फ्रान्स) येथेही हा उपक्रम नेण्याचा आमचा मानस आहे."

### युवराज गाडवे यांना गुंफण उद्योगरत्न पुरस्कार 21 वे गुंफण सद्भावना साहित्य संमेलन

पुणे (दैनिक संध्या) : गुंफण अकादमी कराड आणि भारतीय शिक्षण संस्था कोथरूड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २१ व्या गुंफण सद्भावना साहित्य संमेलनात उद्योजक युवराज गाडवे यांना गुंफण उद्योगरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. जे.पी.नाईक साहित्यनगरी, जे.पी.नाईक शिक्षण आणि विकास केंद्र, कोथरूड येथे संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गाडवे यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी अकादमीचे अध्यक्ष डॉ.बसवेश्वर चेणगे, उपाध्यक्ष बबन पोतदार, सचिव गजानन चेणगे आदी उपस्थित होते. 'काका हलवाई' च्या माध्यमातून युवराज गाडवे यांनी मिठाई, नमकीन सह विविध खाद्यपदार्थ ग्राहकांच्या सेवेत आणले आहेत. गुणवत्ता, विश्वास यांच्या जोरावर काका हलवाई हा ब्रँड झाला असून पुण्याच्या विविध भागात त्यांच्या शाखा आहेत. गाडवे कुटुंब या व्यवसायात सक्रिय असून युवराज गाडवे हे नाविन्यपूर्ण कल्पनांनी व्यवसायला नवा आकार देत आहेत. तसेच बुधवार पेठेतील कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्ट, भिकुबाई मेनकुदळे ट्रस्टचे विश्वस्त म्हणूनही ते सामाजिक कार्यात उत्तम योगदान देत आहेत.

### खाजगीकरणाच्या युगात सहकार जपणाऱ्या संस्था दुर्मिळ : सहकार आयुक्त दीपक तावरे

पुणे (दैनिक संध्या) : सध्या सर्वत्र खाजगीकरणाचे युग झाले आहे. त्यामध्ये रा.स्व. संघाच्या संस्कारात तयार झालेली ग्राहक पेठेसारखी संस्था सहकार जपत उत्तम कार्य करीत आहे. राष्ट्रीय पातळीवर काम करताना अनेकदा ग्राहक पेठेचे उदाहरण दिले जाते. त्यामुळे खाजगीकरणाच्या युगात सहकार जपणाऱ्या अशा संस्था दुर्मिळ होत असल्याचे मत सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी व्यक्त केले. ग्राहक पेठ तर्फे गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सहकार आणि राजकीय क्षेत्रातील व्यक्तींचे विशेष सन्मान करण्यात आले. यावेळी जयराज आणि कंपनीचे राजेश शहा, ग्राहक पेठेच्या अध्यक्षा संध्या भिडे, कार्यकारी संचालक सूर्यकांत पाठक आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमात सहकार क्षेत्रातील योगदानाबद्दल सारस्वत बँक, कॉसमॉस बँक, विश्वेश्वर बँक, पुणे पीपल बँक, संपदा बँक, देवगिरी बँक यांचा तसेच कोहिनूर फुड्स, चितळे बंधू बेके लाईट यांचा त्यांच्या सहकार्याबद्दल सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात स्वरदा बापट, स्वप्नाली पंडित, मंजुश्री खेडकर, बाबुराव चांदेरे, राघवेंद्र उर्फ बापू मानकर, धीरज घाटे, अमर आवळे या ग्राहक पेठेचे ग्राहक असलेल्या व नुकत्याच निवडून आलेल्या नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला.

# अमृत महोत्सवी वर्षात रंगद्रव्य उत्पादक 'सुदर्शन'ची जागतिक भरारी

## ७५ वर्षांत १९ उत्पादन केंद्रांसह १२० देशांत विश्वासार्ह सेवा; शाश्वत विकासासाठी सामाजिक कार्यातही पुढाकार



पुणे (दै. संध्या) :

रंगद्रव्य उत्पादनांत अग्रेसर असलेल्या सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेडने आपला अमृत महोत्सव साजरा करतानाच जागतिक भरारी घेतली आहे. ७५ वर्षांचा प्रवास पूर्ण करताना जर्मनीस्थित ह्युबॅक ग्रुपचे अधिगृहण करताना १२० पेक्षा अधिक देशांत रंगद्रव्य उत्पादनांची सेवा देणारी सुदर्शन केमिकल एकात्मिक जागतिक कंपनी बनली आहे. 'वन सुदर्शन' या संकल्पनेंतर्गत विविध घटक, तंत्रज्ञान आणि संस्कृतींना एकत्र आणून सातत्यपूर्ण, उच्च कार्यक्षम व शाश्वत रंग उपाय देण्यावर कंपनीचा भर आहे.

पुण्यात १९५१ मध्ये स्थापन झालेल्या सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडने गेल्या ७५ वर्षात विश्वासार्ह व ग्राहकाभिमुख सेवा देत रायगड जिल्ह्यातील रोहा व महाडसह जगभरात १९ उत्पादन केंद्र, १२० देशांत रंगद्रव्यांचा पुरवठा व हजारो कर्मचाऱ्यांना रोजगाराची संधी दिली आहे. गेल्या सात दशकांत सुदर्शनने कोटिंग्स, प्लास्टिक्स, शाई, सौंदर्यप्रसाधने आणि विशेष अनुप्रयोगांसाठी वापरल्या जाणाऱ्या रंगद्रव्य क्षेत्रात विश्वासार्ह जागतिक भागीदार म्हणून ओळख निर्माण केली आहे.

सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे ग्लोबल चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश राठी म्हणाले, "७५ वर्षांचा प्रवास साजरा करताना आनंदाची भावना आहे. कंपनीच्या सुरुवातीपासून साधेपणा, काटेकोर अंमलबजावणी, ग्राहक व नियामक मानकांचे पालन आणि शाश्वत उत्पादन यावर भर देण्यात आला. रायगड जिल्ह्यातील रोहा आणि महाड येथील उत्पादन प्रकल्पांनी या मूल्यांना बळकटी दिली असून, कंपनीच्या कार्यक्षमतेत आणि सामाजिक सहभागात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. 'सुदर्शन'ने मार्च २०२५ मध्ये जर्मनीस्थित ह्युबॅक ग्रुपचे अधिग्रहण केले. 'सुदर्शन'च्या प्रवासातील हा महत्वाचा टप्पा असून, यामुळे सुदर्शनची तांत्रिक क्षमता, उत्पादनाची व्यापकता आणि जागतिक स्तरावर अस्तित्व वाढले आहे."

"पुणे, रोहा आणि महाड येथे 'सुदर्शन'चा पाया आहे. मूल्यांवर आधारित आणि जबाबदारीची संस्कृती जोपासल्याने आम्हाला जागतिक स्तरावर अधिक मजबूत होता आले. ७५ वर्षांच्या या प्रवासातील मूल्यांना पुढे घेऊन जात औद्योगिक वाढीसोबतच शाश्वतता, सुरक्षितता आणि समाजविकासावरही आमचा भर राहील. आगामी काळात जागतिक ओळख अधिक मजबूत करत ग्राहक, कर्मचारी आणि समाजासोबत प्रगती साधण्याला प्राधान्य असणार आहे," असे त्यांनी नमूद केले.

## 'भाबीजी घर पर है २.०'मध्ये विनोदी ट्विस्ट्सची चाहूल

पुणे (दै. संध्या) :

एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है २.०' मध्ये ओरिजिनल 'अंगूरी भाबी'ची भूमिका साकारत अभिनेत्री शिल्पा शिंदे पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला आल्या आहेत. आगामी भागांमध्ये अनेक मजेशीर गैरसमज, विनोदी प्रसंग आणि अनपेक्षित ट्विस्ट्स पाहायला मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिल्पा शिंदे म्हणाल्या, "अंगूरीची निरागसता आणि साधेपणा आजही तसाच आहे, पण अभिनेत्री म्हणून मी या भूमिकेला अधिक सखोलपणे समजू लागले आहे. तिच्या अभिव्यक्ती, पॉजेस आणि विनोदी शैली आता अधिक नैसर्गिक वाटते. जुन्या आठवणी कायम ठेवत आजच्या प्रेक्षकांसाठी ही भूमिका नव्याने सादर करण्याचा प्रयत्न आहे." मालिकेत पुनरागमनाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, प्रेक्षकांकडून मिळालेला प्रतिसाद भावनिक आणि उत्साहवर्धक आहे.

"अनेक संदेशांमध्ये 'ओरिजिनल अंगूरी भाबी परतली' असे लिहिलेले पाहायला मिळाले. इतके प्रेम मिळणे ही मोठी गोष्ट आहे," असे त्या म्हणाल्या. टीमसोबत पुन्हा काम करण्याचा अनुभवही त्यांनी खास असल्याचे सांगितले. कलाकारांमधील विश्वास आणि टाइमिंगमुळे विनोद अधिक प्रभावीपणे साकारता येतो.

## क्वालकॉमने १५० दशलक्ष डॉलर्सपर्यंत गुंतवणुकीची घोषणा

पुणे (दै. संध्या) :

क्वालकॉम इन्कॉर्पोरेटेडने आज भारतातील वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान आणि एआय स्टार्टअप इकोसिस्टमला पाठिंबा देण्यासाठी 150 दशलक्ष डॉलर्सपर्यंत गुंतवणूक करण्याचा निर्णय जाहीर केला. ही गुंतवणूक क्वालकॉम व्हेंचर्समार्फत केली जाणार असून सर्व स्तरांवरील स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक केली जाईल. विशेष लक्ष एआयच्या ऑटोमोटिव्ह, आयओटी, रोबोटिक्स आणि मोबाईल क्षेत्रांवर असेल. ही पुढाकार क्वालकॉमच्या भारतातील तंत्रज्ञान क्षेत्रातील दीर्घकालीन बांधिलकीचे प्रतीक आहे आणि जागतिक स्तरावर edge AI पुढे नेण्याच्या नेतृत्वाशी सुसंगत आहे. ही घोषणा क्वालकॉमचे सीईओ क्रिस्टियानो अमोन यांच्या नवी दिल्लीतील इंडिया एआय इम्पॅक्ट समिट मधील सहभागाच्या वेळी करण्यात आली. क्वालकॉम इन्कॉर्पोरेटेडचे अध्यक्ष आणि सीईओ क्रिस्टियानो अमोन म्हणाले, "आमच्या नवीन स्ट्रॅटेजिक एआय व्हेंचर फंड द्वारे क्वालकॉम भारतातील एआयचे पुढचे पर्व घडवणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करत आहे. एआय आता अशा टप्प्यात प्रवेश करत आहे जिथे बुद्धिमत्ता थेट लोक रोज वापरत असलेल्या उपकरणे आणि प्रणालींमध्ये समाविष्ट होत आहे. स्मार्टफोन, पीसी, गाड्या, औद्योगिक यंत्रे, रोबोट्स आणि इतर अनेक गोष्टींमध्ये. यामुळे अनुभव अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण होणार आहेत. हा बदल संपूर्ण उद्योगांना नव्याने आकार देईल आणि भारतातील स्टार्टअप इकोसिस्टम यात महत्त्वाची भूमिका बजावेल." भारताच्या स्टार्टअप क्षेत्रातील प्रचंड वाढ आणि एआयच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे क्वालकॉमला नव्या कंपन्यांना बाजारात अग्रगण्य उपाय तयार करण्यात मदत करण्याची संधी दिसत आहे. जागतिक स्तरावर कार्यक्षम, सुरक्षित आणि शक्तिशाली एज एआय पुढे नेणाऱ्या नेत्याच्या भूमिकेत क्वालकॉम अशा स्टार्टअप्सना पाठिंबा देत आहे जे पुढच्या नवोन्मेषाच्या लाटेला आकार देणार आहेत. क्वालकॉम टेक्नॉलॉजीजचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि क्वालकॉम व्हेंचर्सचे जागतिक प्रमुख क्विन ली म्हणाले, "भारत आज जगातील सर्वात उत्साही नवोन्मेष केंद्रांपैकी एक बनला आहे आणि आम्हाला त्याच्या स्टार्टअप इकोसिस्टमशी असलेली दीर्घकालीन बांधिलकी अधिक दृढ करण्याचा अभिमान आहे. ही अतिरिक्त गुंतवणूक पुढच्या पिढीच्या परिवर्तनकारी तंत्रज्ञानावर काम करणाऱ्या संस्थापकांना आमचा पाठिंबा वाढवते. आम्ही या कंपन्यांना वाढण्यात मदत करण्यास आणि भारताच्या सततच्या प्रगतीत योगदान देण्यास उत्सुक आहोत." क्वालकॉमने 2007 पासून भारतातील स्टार्टअप समुदायात गुंतवणूक केली असून आतापर्यंत 40 हून अधिक कंपन्यांना पाठिंबा दिला आहे.

## विंगमॅनएक्स अवॉर्ड्सने रायडिंग समुदायाचा आणि त्याला एकत्र जोडून ठेवणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला



**पुरस्कार विजेते (क्लब श्रेणी)**

- आरई६५० ओनर्स ग्रुप – क्लब ऑफ द इयर अवॉर्ड
- थ्रॉटल ट्रेकर्स बाइकिंग कम्युनिटी – सोल क्लब अवॉर्ड
- बाइकर बेब्स – वुमन पॉवर कलेक्टिव अवॉर्ड
- दा पुणे व्हीस्ट्रॉम क्रू – सेफ्टी-फर्स्ट क्लब अवॉर्ड
- महू रायडर्स क्लब – मोस्ट ॲक्टिव रायडिंग क्लब अवॉर्ड
- डेटूर इंडिया – बेस्ट क्लब इव्हेंट ऑफ द इयर अवॉर्ड

**पुरस्कार विजेते (वैयक्तिक श्रेणी)**

- श्रेयश वाघ – द अल्टिमेट विंगमॅन अवॉर्ड
- हरदीप सिंग – मेंटर ऑफ द इयर अवॉर्ड
- सामी सैयद – नोमॅडिक सोल अवॉर्ड
- बलजीत सिंग कोछर – लॉंग हॉल लेजेंड्स अवॉर्ड
- साहन सिंग कोछर – रायझिंग स्टार अवॉर्ड
- बॅनी रायरानी – राइड आर्किटेक्ट अवॉर्ड
- ज्योतिप्रकाश डेका – सोल रायडर अवॉर्ड
- रजत गावरले – गार्डियन रायडर अवॉर्ड
- डॉ. मोहनराज शंकर – पिलर ऑफ द कम्युनिटी अवॉर्ड
- मोहुआ पॉली – शी राइड्स फ्री अवॉर्ड
- शताब्दी सामंता – ट्रॅक टायटन अवॉर्ड
- हृषिकेश श्रीकांत मांडे – स्टंट ऐस अवॉर्ड
- कपिल जैन – कम्युनिटी क्रिएटर अवॉर्ड
- प्रियंका बरुआ – डिजिटल पल्स अवॉर्ड

पुणे (दै. संध्या) :

विंगमॅनएक्स अवॉर्ड्स २०२५–२६ चा पहिला सोहळा हयात हॉटेल, पुणे येथे यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमात जबाबदारी, नेतृत्व आणि अर्थपूर्ण योगदानाद्वारे भारताच्या मोटरसायकलिंग संस्कृतीला आकार देणाऱ्या व्यक्ती आणि समुदायांचा गौरव करण्यात आला.

देशभरातील रायडर्स, समुदाय नेते आणि मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत आयोजित हा सोहळा रायडर-नेतृत्वातील आणि तळागाळातील योगदानकर्त्यांसाठी समर्पित भारतातील पहिल्या मोठ्या सन्मान मंचांपैकी एक ठरला.

अभिनेता आणि सूत्रसंचालक अमन यतन वर्मा यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कथाकथन आणि उत्सव यांचा सुंदर संगम साधत, प्रसिद्धीपासून दूर राहून सातत्याने योगदान देणाऱ्या रायडर्सचा येथे गौरव करण्यात आला.

विंगमॅनएक्सचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश साने यांनी या उपक्रमामागील दृष्टीकोन स्पष्ट करताना सांगितले, "रायडर्सना अर्थपूर्ण पद्धतीने एकत्र जोडणे आणि जबाबदारीने रायड करण्यासाठी प्रेरित करणे, या उद्देशाने हे व्यासपीठ उभारण्यात आले. विश्वासावर आधारित योग्य रायडिंग साथीदार शोधण्याच्या साध्या कल्पनेतून सुरू झालेला हा प्रवास आज राष्ट्रीय स्तरावरील रायडर इकोसिस्टम बनला आहे, जिथे ओळख, विश्वास आणि प्रतिष्ठेला महत्त्व आहे. हे पुरस्कार सातत्याने उच्च मानके प्रस्थापित करणाऱ्या रायडर्स आणि समुदायांचा सन्मान करतात."

२०२४ मध्ये सुरू झाल्यापासून विंगमॅनएक्सने ८०,००० पेक्षा अधिक ॲप डाउनलोड्स आणि ६०० हून अधिक रायडिंग क्लब्स जोडत विश्वासार्ह डिजिटल व्यासपीठ म्हणून आपली ओळख अधिक मजबूत केली आहे.

सह-संस्थापक डॉ. साहिल त्रिंबके यांनी रायडिंग संस्कृती घडवण्यात समुदायाच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. "मजबूत गट चांगल्या सवयी निर्माण करतात, सुरक्षिततेला प्राधान्य देतात आणि रायडर्समध्ये जबाबदारीची भावना वाढवतात. हे पुरस्कार या सामूहिक जबाबदारीचा उत्सव आहेत," असे ते म्हणाले.

पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी पुरस्कारांचे मूल्यांकन एका सुसूत्र पद्धतीद्वारे करण्यात आले. प्रथम नामांकनांची छाननी निवड समितीने केली, त्यानंतर सार्वजनिक मतदान आणि स्वतंत्र परीक्षक मंडळाकडून मूल्यमापन झाले. अंतिम विजेते ५०:५० गुणांकन पद्धतीद्वारे ठरवण्यात आले, ज्यात समुदाय सहभाग आणि तज्ज्ञ मूल्यांकन यांना समान महत्त्व देण्यात आले.

विंगमॅनएक्सच्या भागीदार उर्वशी पाटोले यांनी सांगितले की या पुरस्कारांचा उद्देश खऱ्या अर्थाने पात्र व्यक्तींनाच सन्मान देण्याचा आहे. "सातत्य, जबाबदारी आणि योगदान यावरच आमचे लक्ष राहिले आहे. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता परिसंस्था मजबूत करणाऱ्या व्यक्ती आणि समूहांचा गौरव करणे हाच आमचा हेतू आहे," त्या म्हणाल्या.

हा पुरस्कार सोहळा प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. अनिल वालिव - बोरिवली प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई यांचे प्रमुख आणि भारतीय लष्कराचे माजी अधिकारी कर्नल अरुण दत्ताजी पाटोले (निवृत्त) यांच्या उपस्थितीत पार पडला. यासोबतच मोटरसायकलिंग समुदायातील मान्यवर नेत्यांची परीक्षक समितीही उपस्थित होती.

डीएसजी, १०० केएमपीएच, व्रेडेस्टाइन टायर्स, ब्लूआर्मर कम्युनिकेशन आणि अशोक ट्रॅव्हल वर्ल्ड या इकोसिस्टम भागीदारांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेले हे पुरस्कार भविष्यात दरवर्षी आयोजित करण्याचे नियोजन आहे.

विंगमॅनएक्स ट्रॉफी ही केवळ एक पुरस्कार नाही ती धैर्य, शिस्त आणि समुदायभावनेतून घडलेल्या रायडरच्या प्रवासाला अर्पण केलेली एक शिल्पात्मक आदरांजली आहे. मध्यभागी असलेले हेल्मेट सुरक्षितता, ओळख आणि तग धरण्याच्या शक्तीचे प्रतीक आहे; तर पंख स्वातंत्र्य आणि बंधुभाव दर्शवतात. परस्पर जोडलेली गिअर्स अचूकता आणि सातत्यपूर्ण प्रगतीचा गौरव करतात. तिचा सुवर्ण रंग मिळवलेल्या वारशाचे प्रतिनिधित्व करतो, आणि काळा पाया सामर्थ्य व नम्रतेचे प्रतीक आहे. एका जीवनपद्धतीचा उत्सव साजरा करणारी ही ट्रॉफी आहे.

# शिक्षणाचे 'केरळ मॉडेल' विरुद्ध महाराष्ट्रातील शाळा-बंदी धोरण

पुणे (दै. संध्या) :

■ ग्रामीण शिक्षणावर परिणाम होण्याची भीती

■ शैक्षणिक धोरणांवर प्रश्नचिन्ह; सामाजिक विषमता वाढण्याची शक्यता व्यक्त

शिक्षण ही राष्ट्राच्या विकासाची मूलभूत पायरी मानली जाते. मात्र सध्या देशातील दोन प्रगत राज्यांमध्ये शिक्षणासंदर्भात घेतल्या जात असलेल्या भिन्न निर्णयांमुळे विकासाची दिशा नेमकी कोणती, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एका बाजूला केरळ राज्याने उच्च शिक्षण मोफत करण्याच्या दिशेने पावले उचलली असल्याचे सांगितले जाते, तर दुसरीकडे महाराष्ट्रात कमी पटसंख्या हे कारण देत ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांचे समूहीकरण किंवा बंद करण्याबाबत चर्चा सुरू असल्याने ग्रामीण शिक्षणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा या वाड्या-वस्त्यांवरील शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील मुलांसाठी शिक्षणाचा मुख्य आधार मानल्या जातात. शाळा दूर गेल्यास वाहतूक व्यवस्था, आर्थिक परिस्थिती आणि सामाजिक अडचणी यामुळे विद्यार्थ्यांची गळती वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुलींच्या शिक्षणावरही याचा परिणाम होऊ शकतो, असे मत काही शिक्षण अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

भारताची मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास असून, गावखेड्यांमध्ये शिक्षणाची पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. ग्रामीण शाळा सक्षम करून रोजगाराभिमुख व कौशल्याधारित शिक्षण देण्यावर भर देणे काळाची गरज असल्याचेही मत मांडले जात आहे.

काही विश्लेषकांच्या मते, सरकारी शाळांची क्षमता कमी झाल्यास खाजगी शिक्षण संस्थांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढू शकतो, ज्यामुळे शिक्षणाचे बाजारीकरण होण्याची भीती आहे. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (घटनात्मक कलम २१-अ) लक्षात घेऊन शेजारील शाळांची उपलब्धता राखणे आवश्यक असल्याचेही नमूद केले जात आहे. दरम्यान, शासनाच्या धोरणांबाबत पुढील मुद्द्यांवर स्पष्टीकरणाची गरज व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील शाळा बंद करण्यामागील नेमकी कारणे व आर्थिक गणित काय? समूहीकरणामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम कसा कमी केला जाणार?

सरकारी शाळा मजबूत करण्यासाठी शिक्षक, सुविधा व निधी याबाबत ठोस उपाययोजना काय? शाळा बंद करणे हा उपाय नसून त्या अधिक सक्षम करण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी, अशी मागणी पुढे येत आहे. शिक्षण हा व्यवसाय नसून प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार आहे, त्यामुळे ग्रामीण शिक्षण टिकवून ठेवण्यासाठी व्यापक व दीर्घकालीन धोरण आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.



# ‘सायको सैयां’मध्ये रवी किशन, तेजस्वी प्रकाश आणि अनुद सिंग ढाका प्रमुख भूमिकेत

## अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर २५ फेब्रुवारीपासून सायको सैयां मोफत स्ट्रीम होणार




**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, अॅड-सपोर्टेड व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा देणाऱ्या अॅमेझॉन एमएक्स प्लेयरने आज आपल्या आगामी रोमान्स-थ्रीलर सायको सैयां’च्या अधिकृत ट्रेलरची घोषणा केली आहे. ही कथा आपल्या नेहमीच्या प्रेमकथेसारखीच आहे, एका व्यापक, फिल्मीस्टाइल प्रेमकथेसारखी सुरू होत हळूहळू हृदयाचे ठोके वाढवते. या कथेत प्रेमातला आवेग आणि वेडेपणा दिसू लागतो आणि मग हे सगळे असह्य होते. रवी किशन, तेजस्वी प्रकाश आणि अनुद सिंग ढाका यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सिरिजमध्ये सृष्टी श्रीवास्तव, सुरभी चंदना, वरुण भगत, अश्विनी कलसेकर आणि यशपाल शर्मा यांच्याही मुख्य भूमिका आहेत.

या ट्रेलरमध्ये कार्तिक शायरीची आवड असलेल्या उज्जैनमध्ये राहणाऱ्या तरुणाची ओळख समोर येते, ज्याला वाटत असते की, त्याचे विश्व पूर्ण करणारी मुलगी त्याला सापडली आहे – चारू. त्याच्यासाठी, प्रेम म्हणजे निव्वळ टाइमपास नसून ते महाकाव्यासारखे परिपूर्ण आणि कोणतीही जोखीम घेण्याची तयारी असलेले असते. पण प्रत्येक तीव्रतेची किंमत मोजावी लागते. कार्तिकच्या भावना जसजशा खोल होत जातात, तसतसे प्रेमाला धरून ठेवण्याची गरजही वाढत जाते. तो शहरांमध्ये तिचा पाठलाग करतो, सगळ्या अधिकारांच्या विरोधात जातो आणि त्याच्या मार्गात अडथळा आणणाऱ्या कोणालाही आव्हान देतो. तो ज्याला प्रेम म्हणतो ते आता धोकादायक आणि मालकी हक्क गाजवणारे वाटू लागते.

उज्जैन, कटनी आणि जॉर्जियाच्या पार्श्वभूमीवरील या कलाकृतीच्या ट्रेलरमध्ये तीव्र संघर्ष, वाढती गुन्हेगारी शक्ती, भावनिक हेरगिरी आणि अधिकाधिक नाजूक वाटणाऱ्या नातेसंबंधांची झलक दाखवण्यात आली आहे. रवी किशन प्रत्येक वळणावर शक्तीचे संतुलन बदलणाऱ्या उपस्थितीसह ठाशीव भूमिकेत अंकुश ठेवतो. ज्यामुळे कथा अधिक मजबूत आणि धोकादायक वाटते. ट्रेलर संपल्यानंतर बराच काळ प्रश्न कायम राहतो- प्रेम सीमारेषा ओलांडून कधी पुढे जाते?

अॅमेझॉन एमएक्स प्लेयरचे हेड ऑफ कंटेंट अमोघ दुसाद म्हणाले, “अॅमेझॉन एमएक्स प्लेयरमध्ये केवळ आकर्षकच नव्हे तर भावनांचे एक अद्वितीय मिश्रण असलेल्या कथा आणण्याचा आमचा सतत प्रयत्न आहे. सायको सैयां’ची सुरुवात प्रेक्षकांना आवडणाऱ्या आकर्षक क्लासिक रोमान्सने होते. परंतु ही कथा थोड्याच अवधीत झटपट एका सखोल, मानसिक कथनात बदलून जाते. देशभरातील व्यापक आणि वैविध्यपूर्ण प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या लक्षवेधी, भावनिकदृष्ट्या आकर्षक कथा सादर करण्याच्या आमच्या व्यापक दृष्टीकोनात ही सिरीज बसते.”

आपल्या ओटीटीवरील पदार्पणाबद्दल तेजस्वी प्रकाश म्हणाली, “सायको सैयां हे माझे अभिनय करकीर्दीतील ओटीटी पदार्पण असून यात साकारलेल्या बहूपदरी पात्रासाठी मी आभारी आहे. चारू सुरुवातीला विश्वास आणि आरामात असते; परंतु तिचे जग बदलत राहते. त्या बदलाला ती कशाप्रकारे प्रतिसाद देते, शंका, भीती आणि काहीशा चुकीची वाढती जाणीव तिच्या प्रवासाला आकर्षक बनवते. जसजसा धोका वाढतो, तसतशी कधीही कल्पना न केलेल्या वास्तवाचा सामना करण्यास भाग पाडले जाते.” सुप्रसिद्ध अभिनेता रवी किशन पुढे म्हणाला, “सायको सैयां ही केवळ एक रोमान्टीक कथा नसून शक्तीचा वापर, नियंत्रण आणि अनियंत्रित भावनांच्या परिणामांबद्दल देखील आहे. माझ्या पात्रात प्रभावाची शक्ती आहे आणि त्याला त्यात आनंद मिळतो. तो त्याच्या स्वतःच्या नियमांनुसार खेळतो आणि त्या व्यक्तिरेखेसोबत एक विशिष्ट अनिश्चितता आणतो. ही एक अशी भूमिका आहे ज्याने मला तीव्र, बिनशर्त होण्याची आणि त्यानंतरच्या गोंधळात खूप मजा करण्याची संधी दिली”

स्वत:च्या पात्राबद्दल बोलताना, अनुद सिंग ढाका म्हणाला, "कार्तिक हा सामान्य रोमान्टीक हिरो नाही, तर तो भव्य, महाकाव्य-आधारित आणि नियतीवर चालणाऱ्या प्रेमावर विश्वास ठेवतो. पण कथा जसजशी पुढे सरकत जाईल, तसतसे तुमच्या लक्षात येईल की समतोल नसलेले प्रेम धोकादायक ठरू शकते. नायकाची कृती वेडातून नव्हे तर उत्कटतेने येते. हीच कथानकाची जमेची बाजू म्हणावी लागेल. त्याच्या मनातला अतूट विश्वास, त्या मानसिकतेने पाऊल टाकणे आणि स्वत:च्या भावनांची आखणी करण्याचा तोल आव्हानात्मक आणि भूमिकेत झोकून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. कारण कार्तिकच्या जगात प्रेम सदोष नसते, ते अंतीम असते.”

कथा जशी शेवटच्या क्षणांपर्यंत पोहोचते, तणाव ताणला जातो, निष्ठा तुटत जाते आणि भावना पेटून उठते. नियंत्रण राखण्याच्या नादात पकड घट्ट होत जाते आणि धोका निर्माण होतो. त्यामुळे वातावरण अस्थिर आणि कल्पनेच्या पलीकडे जाते. सायको सैयां’च्या दुनियेत, प्रेम या गोंधळातून वाचेल की हेच सर्वकाही तुटण्याचे कारण असेल? 'सायको सैयां' 25 फेब्रुवारीपासून केवळ अॅमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य स्ट्रीम होणार आहे. ही सिरीज एमएक्स प्लेयर अॅप, अॅमेझॉन शॉपिंग अॅप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि एअरटेल एक्सस्ट्रीमवर उपलब्ध असेल.

---

## जगदाळे कुटुंबासह मेधा कुलकर्णी यांनी घेतली शिंदे, बावनकुळे यांची भेट

**पुणे (दै. संध्या) :**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडित जगदाळे कुटुंबातील प्रगती जगदाळे व त्यांची कन्या आसावरी जगदाळे यांच्यासमवेत राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी मुंबईत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन आसावरी यांना शासकीय सेवेत समाविष्ट करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. एकनाथ शिंदे व चंद्रशेखर बावनकुळे या दोघांनीही या विषयाची संवेदनशीलता लक्षात घेत तात्काळ मुख्यमंत्री कार्यालयातील सचिव श्रीकर परदेशी, गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. तसेच पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम यांना शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. दोघांनीही या विषयात तत्परतेने लक्ष घालून कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याबद्दल जगदाळे कुटुंबीय व मेधा कुलकर्णी यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "स्वर्गीय संतोष जगदाळे यांच्यावर पहलगाम येथे केवळ हिंदू असल्यामुळे झालेला हल्ला ही अत्यंत वेदनादायी आणि अस्वस्थ करणारी घटना होती. त्या दुःखद प्रसंगी महाराष्ट्रातील अनेक मान्यवर नेत्यांनी आसावरी यांना शासकीय सेवेत संधी देण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाला दहा महिने उलटल्यानंतर या विषयाची तातडीने दखल घ्यावी यासाठी, माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले, तसेच गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यानंतर आता या दोन्ही नेत्यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. या प्रकरणाला आता गती मिळताना दिसत असून, ही दिलासा देणारी बाब आहे. श्रीमती प्रगती आणि त्यांची कन्या आसावरी यांना दिलेले आश्वासन सरकार लवकरात लवकर पूर्ण करेल, असा मनापासून विश्वास आहे. कारण हा केवळ एका कुटुंबाचा प्रश्न नसून न्याय, संवेदना आणि सामाजिक जबाबदारी यांचा विषय आहे.

---




## निसानकडून INR 5.65 Lakhs प्रारंभी किमतीत पूर्णपणे नवीन ग्रॅव्हाइटच्या अनावरणासह भारतातील धाडसी पुनरुज्जीवनाचे संकेत

- निसान मोटर इंडियाच्या प्रॉडक्ट ऑफेन्सिव्हअंतर्गत पहिले उत्पादन, जे भारतातील ब्रँड उत्क्रांतीच्या प्रवासात एक निर्णायक पाऊल आहे.
- १.४ अब्ज भारतीय आणि त्यांच्या बदलत्या गतिशीलतेच्या गरजांनी प्रेरित असलेले आधुनिक भारतीय कुटुंबांसाठी उद्देशाने निर्मित वाहन
- निसानच्या खास 'सी' डिझाइनसह निर्विवाद ओळखीसाठी धाडसी, उद्देशपूर्ण भूमिका.
- अपवादात्मक मॉड्यूलरिटी, लवचिक २ ते ७ आसन व्यवस्था आणि सामान साठवणुकीची सर्वोत्तम क्षमता.
- ३०+ मानक सुरक्षा वैशिष्ट्ये ज्यात ६ एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्थिरता नियंत्रण, ट्रॅक्शन नियंत्रण, हिल स्टार्ट असिस्ट आणि ब्रेक असिस्ट यांचा समावेश आहे.

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

निसान मोटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एनएमआयपीएल) ने आज न्यू निसान ग्रॅव्हाइटची घोषणा केली. त्याची किंमत सुमारे INR 5.65 लाख रुपये आहे. एक धाडसी आणि गेम-चेंजिंग ७-सीटर एमपीव्ही, ग्रॅव्हाइट निसानच्या भारतातील प्रवासात एका नवीन अध्यायाची सुरुवात करते.

मेड इन इंडिया, मेड फॉर इंडियाने प्रेरित होऊन, ग्रॅव्हाइट हे निसान मोटर इंडियाच्या नवीन उत्पादन मोहिमेअंतर्गत बाजारात आणले जाणारे पहिले उत्पादन आहे - जे कंपनीची भारतातील मजबूत वचनबद्धता आणि उपस्थिती अधोरेखित करते.

"ग्रॅव्हाइट" हे नाव १.४ अब्ज भारतीय आणि देशाच्या विविधतेला आकार देणाऱ्या १९,००० स्थानिक भाषा आणि परंपरांनी प्रेरित आहे. ग्रॅव्हाइट हे भारतीय कुटुंबांच्या वाढत्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी उद्देशाने तयार केले गेले आहे. हे गाडीचे स्थान, वैविध्यपूर्ण प्रतिभा, आराम आणि दैनंदिन व्यावहारिकतेसह रस्त्यावरील उपस्थिती दर्शवते. मध्य पूर्व, केएसए, सीआयएस आणि भारत - निसान आणि इन्फिनिटीचे विभागीय उपाध्यक्ष आणि अध्यक्ष थियरी सब्बाग म्हणाले, "निसानच्या जागतिक महत्त्वाकांक्षांमध्ये भारत केंद्रस्थानी आहे. गेल्या वर्षभरातील आमचे कार्य या बाजारपेठेतील आमची दीर्घकालीन वचनबद्धता दर्शवते. ऑल-न्यू निसान ग्रॅव्हाइट हे केवळ उत्पादन नाही; ते भारतात निसानसाठी शाश्वत वाढीच्या टप्प्याची सुरुवात आहे. चेन्नईतील आमच्या सहयोगी भागीदारासह स्थानिक उत्पादन आणि भविष्यासाठी तयार उत्पादन रोडमॅपसोबत आम्ही महत्त्वाच्या विभागांमध्ये स्पर्धा करण्यासाठी, वाढण्यासाठी आणि नेतृत्व करण्यासाठी येथे आहोत." निसान मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ वत्स म्हणाले: “न्यू निसान ग्रॅव्हाइट ही भारतीय कुटुंबांची विविधता, व्याप्ती आणि महत्त्वाकांक्षेने प्रेरित आहे. तिच्या मॉड्यूलर सीटिंगपासून ते प्रभावी भूमिकेपर्यंत प्रत्येक तपशील, भारतीय ग्राहकांची जीवनशैली, प्रवासाची पद्धत आणि विकास हे प्रतिबिंबित करतो. आमच्यासाठी ग्रॅव्हाइट हे केवळ उत्पादन परिचयापेक्षा जास्त आहे. निसान भारताच्या गतिशीलता आकांक्षांशी खरोखर जुळणाऱ्या वाहनांची रचना, उत्पादन आणि गुंतवणूक करत राहील हे वचन आहे.”

---

## उपसरपंचपदी अजित मेदनकर

**चाकण (दै. संध्या) :**

प्रति जेजुरी म्हणून प्रख्यात असलेल्या खेड तालुक्यातील मेदनकरवाडी येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अजित ज्ञानोबा मेदनकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. अॅड. संकेत मेदनकर यांनी आपला उपसरपंच पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त झाले होते. या पदासाठी मेदनकरवाडी ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. अजित मेदनकर यांचा उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज दाखल झाल्याने व छाननीत त्यांचा अर्ज वैध ठरल्याने त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याची माहिती मेदनकरवाडीचे सरपंच अमोल साळवे व ग्रामपंचायत अधिकारी सुभाष धोत्रे यांनी दिली. मेदनकरवाडी ही खेड तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीचे उपसरपंच अॅड. संकेत मेदनकर यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेसाठी उपसरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच अमोल साळवे, सदस्य महेंद्र मेदनकर, संजय वाघमारे, मंगल मेदनकर, नीलम मेदनकर, स्वाती गवते, जयश्री भुजबळ, सुमन खरात, पल्लवी भुजबळ, सुरेखा मेदनकर, सिंधू मेदनकर, संभाजी मेदनकर, गणेश भुजबळ, विजय मेदनकर, सलोनी मेदनकर आदी उपस्थित होते. उपसरपंचपदी अजित मेदनकर यांची निवड झाल्याबद्दल ग्रामपंचायत अधिकारी सुभाष धोत्रे व सरपंच अमोल साळवे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

---


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सर्व्हे नंबर ६४४/२, रेणुका को. ऑप. सोसायटी मधील बिल्डिंग नं. A-१/६ मधील तळ मजल्या वरील, दुकान नं. १, यांसी क्षेत्र १५० चौ. फुट बिल्ट अप, बिबवेवाडी पुणे ४११०३७ हि मिळकत आहे हि मिळकत पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील असून ही मिळकत कै. मंदा उदयसिंग परदेशी यांच्या नावे होती परंतु त्यांचे दिनांक १९/०२/२०२५ रोजी पुणे येथे निधन झाले असून तसेच त्यांचे पती नामे : कै. उदयसिंग हनुमानसिंग परदेशी यांचे देखील निधन दिनांक : १९/०५/१९९६ रोजी पुणे येथे झालेले आहे.

सदर कै. मंदा उदयसिंग परदेशी व कै. उदयसिंग हनुमानसिंग परदेशी ह्यांच्या निधनानंतर वर नमूद मिळकतीस १. सौ. भारती अनिल हजारे २. सौ. गीता समीर राजपूत ३. केवल उदयसिंग परदेशी हे तीन वारसदार असून ह्या पैकी दोघांनी म्हणजेच सौ. गीता समीर राजपूत व केवल उदयसिंग परदेशी ह्यांनी ह्या मिळकती संदर्भातील सर्व कायदेशी हक्क व अधिकार सौ. भारती अनिल हजारे ह्यांच्या लाभत सोडलेले आहेत तसे त्यांनी रितसर हक्क सोड पत्र केलेले असून नोंदणीकृत दस्त क्र. ३९६७/२०२६, दिनांक : ०६/०२/२०२५ रोजी सह दु.नि.हवेली क्र. ९ मध्ये नोगिकृत केलेला आहे.

सदर त्या दस्ता नुसार वर नमूद मिळकतीस सौ. भारती अनिल हजारे ह्या एकमेव वारसदार आहेत .

सदर सौ. भारती अनिल हजारे ह्यांच्या व्यतिरिक्त कोणीही इतर वारस नाहीत. सबब सदर मिळकती मध्ये अन्य कुणाही व्यक्तीचा गहाण दान, लीन, लीस, करार, बक्षीस, मदार ई. कोणत्याही प्रकारचे कसलेही हक्क व हीतसंबंध, अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसात, अस्सल कागदपत्रांनिशी आमची तशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत हि निर्वेध व निजोखमी असल्याचे मान्य करून, सदर मिळकती मध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हीतसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे गृहीत धरले जाईल त्यापश्चात कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही, व आम्ही ती स्वीकारणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

करुणा सुधाकर भुजबळ
अॅडव्होकेट
वनाई भवन, ऑफिस नं. १, पहिला मजला
साई मंदिर जवळ, शिवाजी नगर, पुणे ४११००३


---

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित युवाची ए4 लाँगबुक्स आणि मराठी ‘सुविचार’ पेन्सिली महाराष्ट्रभरातील दुकानांत उपलब्ध

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



महाराष्ट्रभरात साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर स्टेशनरी ब्रँड 'युवा'तर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित शालेय साहित्याची विशेष मालिका सादर करण्यात आली आहे. सतराव्या शतकातील मराठा राज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्मृतीत अत्यंत महत्त्वाचे असून, या उत्पादनांच्या माध्यमातून परिचित ऐतिहासिक संदर्भ थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येतात. शाळांमधील विविध वयोगटांच्या गरजा लक्षात घेऊन ही श्रेणी साकारण्यात आली आहे. मोठ्या आकाराची ए4 लाँगबुक्स माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतात, तर पेन्सिली सर्वच वयोगटांतील विद्यार्थ्यांच्या वापरासाठी अनुकूल आहेत. या सर्व ए4 लाँगबुक्सवर छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित प्रसंग आणि प्रतीकांचे चित्रात्मक सादरीकरण करण्यात आले आहे. तसेच या पेन्सिलींवर छोटे मराठी सुविचारही देण्यात आले आहेत, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुणांचे वर्णन करणारे सुविचारही समाविष्ट आहेत. दैनंदिन शालेय साहित्यामध्ये प्रादेशिक आणि सांस्कृतिक संदर्भ समाविष्ट करण्याचा वाढता ट्रेंड या उपक्रमातून दिसून येतो. समाज माध्यमांचा प्रभाव अधिकाधिक जागतिक स्वरूपाचा होत असताना, विद्यार्थ्यांच्या रोजच्या आयुष्यात सांस्कृतिक ओळख जपली जावी, यासाठी शिक्षक आणि पालकांकडून अशा उपक्रमांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. युवा स्टेशनरीचे चीफ स्ट्रॅटजी ऑफिसर अभिजीत सान्याल म्हणाले की, आधुनिक विचारसरणी आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा संगम साधण्याचा हा प्रयत्न आहे. “विद्यार्थी दररोज या वस्तूंचा वापर करतात. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या नेतृत्वाशी जोडलेल्या शिस्त, धैर्य यांसारख्या गुणांची त्यांना सतत आठवण करून देण्याचे काम या वस्तू करू शकतात,” असे ते म्हणाले. विक्रेत्यांच्या मते, अशा संकल्पनांवर आधारित उत्पादनांना सहसा जयंतीदिनी किंवा विशेष प्रसंगांच्या काळात अधिक मागणी असते. मात्र, विद्यार्थ्यांना ती आवडल्यास संपूर्ण शैक्षणिक वर्षात त्यांची विक्री सुरू राहते. नवीन शैक्षणिक सत्र जवळ येत असल्याने, ही उत्पादने ‘बॅक-टू-स्कूल’ खरेदीचा भाग ठरण्याचीही शक्यता आहे.

---


### महावितरण — ई - निविदा सूचना

बारामती परिमंडलातील नादुरुस्त उच्चदाब रोहित्रांच्या (पॉवर ट्रान्सफॉर्मर) दुरुस्तीसाठी अनुज्ञप्तीधारक विद्युत कंत्राटदारांकडून वार्षिक दर करारावर **ई-निविदा क्र. मुअ/बापमं/टी-11/2025-26** मागविण्यात येत आहे. **निविदा रक्कम रुपये 200 लाख**, सविस्तर माहितीसाठी कंपनीच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp** या संकेतस्थळाला भेट दयावी. **संपर्क अधिकारी** : श्री. एस.पी. गायकवाड, कार्यकारी अभियंता (प्र), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, बारामती परिमंडल, ऊर्जाभवन, तिसरा मजला, भिगवण रोड, बारामती, जि. पुणे-413133, **मो. नं. 7875768003.**

PRO No. PRO/BMTZ/212/2025-26 — **मुख्य अभियंता बारामती परिमंडळ**

### महावितरण — ई - निविदा सूचना

अधीक्षक अभियंता, महावितरण पुणे ग्रामीण मंडल कार्यालया तर्फे मान्यताप्राप्त व नोंदणीकृत विद्युत ठेकेदारांना पुणे ग्रामीण मंडलांतर्गत न्युमरिकल रिले, रोटो सील पुरवणेबाबत व मुळशी विभागांतर्गत पी सी 0 चे CMRI रिडींग घेणेबाबत ई-निविदा मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम (लाख) |
|---|---|---|---|
| 1 | SE/PRC/ T-04/2025-26 | पुणे ग्रामीण मंडलांतर्गत न्युमरिकल रिले पुरवणेबाबत. | 5.00 |
| 2 | SE/PRC/ T-13/2025-26 | पुणे ग्रामीण मंडलांतर्गत रोटो सील पुरवणेबाबत. | 5.00 |
| 3 | SE/PRC/ T-06/2025-26 | पुणे ग्रामीण मंडलांतर्गत मुळशी विभागांतर्गत पी सी 0 चे CMRI रिडींग घेणेबाबत | 100.00 |

वरील निविदा महावितरण कंपनीच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा क्र. **T-04/2025-26 व T-13/2025-26** विक्रीसाठी **दि. 20.02.2026 ते दि. 27.02.2026, 11.00 वाजेपर्यंत** उपलब्ध राहतील. निविदा क्र. **T-06/2025-26** विक्रीसाठी **दि. 23.02.2026 ते दि. 06.03.2026 11.00 वाजेपर्यंत** उपलब्ध राहतील. निविदेमधील बदल, मुदतवाढ आदी महावितरणच्या संकेतस्थळावर प्रकाशित केला जाईल. अधिक माहितीसाठी **संपर्क**: 7875767021

PRO/PZ/239/2025-26 — **अधीक्षक अभियंता, पुणे ग्रामीण मंडल, पुणे**


---

## वाल्हेत माजी विद्यार्थ्यांचा महामेळावा उत्साहात

**वाल्हे (दै. संध्या) :**



वाल्हे ( ता. पुरंदर ) येथील महर्षी वाल्मीकी विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा महामेळावा उत्साहात पार पडला. या महामेळाव्यात सन १९५२ ते २०२४ या कालावधीत शिक्षण घेतलेल्या विविध पिढ्या एकाच छताखाली एकत्र आल्याचे चित्र पहावयास मिळाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त न्यायाधीश माधुरी मोरे या होत्या. यावेळी डॉ. दिगंबर दुर्गाडे, डॉ. एम. एस. जाधव, प्रमोद शहा, प्रा. शिवाजी साळुंखे, प्रा. संतोष ढवळे, सचिन लंबाते, केशव शहा, अतुल गायकवाड, उमेश शहा, दत्तात्रेय पवार, महादेव चव्हाण, अमोल खवले, राहुल यादव, रावसाहेब चव्हाण, सागर भुजबळ, संजीव मोरे, दादासाहेब राऊत यांच्यासह दोनशेहून अधिक माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

या महामेळाव्यात विद्यालयाच्या स्थापना काळातील शिक्षण घेतलेल्या तब्बल नव्वद वर्षांच्या ज्येष्ठ विद्यार्थ्यांपासून ते पंचवीस वर्षांच्या माजी विद्यार्थ्यांची एकत्रितपणे उपस्थिती अक्षरशःचर्चेचा विषय ठरली . यावेळी अनेक वर्षांनी एकमेकांना भेटण्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर झळकत होता. छोट्याशा शाळेपासून आजच्या प्रशस्त इमारतीपर्यंतचा प्रवास आठवत सर्वजण भावुक झाले. शिक्षकांचे मार्गदर्शन, शालेय शिस्त, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलने यांचा उल्लेख होताच उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. या दरम्यान माजी विध्यार्थी संघटनेच्या अध्यक्षपदी प्रा. अनिल कुंभार तर उपाध्यक्षपदी किशोर कुदळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून संघटनेची कार्यकारिणी देखील जाहीर करण्यात आली. यावेळी प्राचार्य सतीश निगडे यांनी प्रास्ताविकात विद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रा. अनिल कुंभार यांनी सूत्रसंचालन तर गिरीश पवार यांनी आभार मानले.

---


### पुणे महानगरपालिका

**निविदा जाहिरात - नवीन कामे**

विक्री कालावधी दिनांक :-१९/०२/२०२६ ते २८/०२/२०२६ दुपारी २:३० पर्यंत
स्विकृती दिनांक :-१९/०२/२०२६ ते २८/०२/२०२६ दुपारी २:३० पर्यंत

जाहिरात क्र. १/१७३३ दि. १८/०२/२०२६
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक:- ०२/०३/२०२६ दुपारी ३:३० वा.

| अ. | निविदा.क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पुर्वगणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ VEHICLE /2025/180 | मोटार वाहन विभाग | पुणे महानगरपालिकेकडील वाहनांच्या दैनंदिन दुरूस्तीसाठी Twin Post Car Elevator मशिन खरेदी करणे. | ४१५ | ४,१७,०००/- | ४,१७०/- | १ वर्ष/टेंडर रक्कम संपेपर्यंत | श्री. नितीन शिंदे ९६८९९३१७०३ श्री. प्रविण वाढवे ९६८९९८५४६२ |

अ) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी / म.न.पा. मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.

ब) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकिट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ड) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती/प्रशिक्षण टेंडर सेल विभाग पुणे महानगरपालिका येथे मिळेल.

ई) कार्यालयीन आदेश क्र. अतीमआ (वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)
मोटार वाहन विभाग
पुणे महानगरपालिका



# दिव्यांगांसाठी खरेदी केलेली ई-वाहने त्वरित वाटप करा

## अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिव्यांग बांधवांच्या स्वावलंबनासाठी खरेदी केलेली तीन चाकी फिरती ई-वाहने गेल्या दोन महिन्यांपासून दिव्यांग भवनाच्या पार्किंगमध्ये धूळ खात पडून आहेत, ही बाब अत्यंत संतापजनक व धक्कादायक आहे. डिसेंबर महिन्यापासून वाहन वाटप रखडले असून एकाही लाभार्थ्याला वाहन देण्यात आलेले नाही. यामुळे दिव्यांग बांधवांमध्ये प्रचंड असंतोष व संताप निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रकारामुळे दिव्यांगांच्या हक्कांवर गदा येत आहे. त्यामुळे लवकरात लवकर ई-वाहने वाहने दिव्यांग बांधवांना वाटप करण्यात यावी, अन्यथा मनसे स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी दिला आहे.

याबाबत महापालिका आयुक्त तसेच महापौर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महापालिकेने लाखो रुपयांचा खर्च करून खरेदी केलेली वाहने वापराविना पडून राहणे हे प्रशासनाच्या निष्क्रियतेचे व असंवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे. दिव्यांग नागरिकांना रोजगार, व्यवसाय, शिक्षण व दैनंदिन प्रवास सुलभ व्हावा, या उद्देशाने ही वाहने खरेदी करण्यात आली होती. 'पर्पल जल्लोष' या कार्यक्रमात वाहन वाटपाची मोठ्या थाटात घोषणा करण्यात आली, मात्र आरटीओच्या तथाकथित तांत्रिक कारणांचा बागुलबुवा करून वाटप अचानक थांबविण्यात आले. त्यानंतर प्रशासनाने पूर्णपणे हात वर केले असून आजतागायत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.

सध्या सदरील ई-वाहने दिव्यांग भवन परिसरात उभी असून वाहनांवर धूळ साचलेली आहे, काही वाहनांचे टायर पंक्चर झाल्याचेही निदर्शनास आले आहे. ही केवळ दुर्लक्षाची नव्हे तर दिव्यांग बांधवांच्या हक्कांवर चाललेली उघड अन्यायाची बाब आहे. तरी महापालिकेने आरटीओ विभागाशी तातडीने समन्वय साधून सर्व तांत्रिक अडचणी तत्काळ दूर कराव्यात व रखडलेले ई-वाहन वाटप त्वरित सुरू करावे. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे स्टाईलने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, याची प्रशासनाने गंभीर नोंद घ्यावी. याप्रकरणी कोणतीही टाळाटाळ किंवा वेळकाढूपणा सहन केला जाणार नाही. आपण सदर तक्रारीची तात्काळ दखल घेऊन ठोस कार्यवाही करावी, ही विनंतीवजा अपेक्षा आहे. असे सचिन चिखले यांनी म्हटले आहे. दरम्यान, मनसेच्या शिष्टमंडळाने नवनियुक्त महापौर रवी लांडगे यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी मनसे शहर सचिव रुपेश पटेकर, मनसे उपशहराध्यक्ष बाळा दानवले, मनसे विधानसभा अध्यक्ष मयूर चिंचवडे, प्रबुद्ध कांबळे व प्रविण कांबळे आदी उपस्थित होते.

# महापौर रवि लांडगे यांचा गौरवचिन्हाने सन्मान



पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून केमिस्ट व्यावसायिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी, नियमावली सुलभ करण्यासाठी आणि आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचा माझा प्रयत्न राहील. शहराच्या सर्वांगीण विकासात आरोग्य क्षेत्राला प्राधान्य देत, प्रशासन आणि व्यावसायिक यांच्यात समन्वय वाढविण्यावर भर देण्यात येईल. पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनतर्फे 'माझा फार्मासिस्ट, माझा अभिमान' या गौरवचिन्हाने केलेला सन्मान माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी आहे. मी स्वतः फार्मासिस्ट असल्यामुळे आरोग्यसेवेच्या क्षेत्रातील जबाबदाऱ्या आणि आव्हाने जवळून अनुभवलेली आहेत. समाजाच्या आरोग्य सुरक्षेत केमिस्ट बंधू-भगिनींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. हा सन्मान माझा नसून संपूर्ण केमिस्ट समुदायाचा आहे. आपण दाखवलेला विश्वास आणि प्रेम हेच माझ्या कार्याची खरी प्रेरणा आहे. अशी भावना महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केली.

नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत महापौरपदी निवड झाल्याबद्दल नवनिर्वाचित महापौर रवि लांडगे यांचा पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनतर्फे सन्मान करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवनातील महापौर कक्षात केमिस्ट असोसिएशनतर्फे महापौर रवि लांडगे यांचा "माझा फार्मासिस्ट, माझा अभिमान" या गौरवचिन्हाने सन्मान करण्यात आला.यावेळी आपल्या भावना व्यक्त करतांना महापौर रवि लांडगे बोलत होते.

या प्रसंगी पुणे जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष विवेक तापकीर, पीआरओ सचिन धोका, पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष रवी पवार, सचिव चेतन शिंगवी, खजिनदार नंदू पानसरे, भोसरी केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष वसुदेव चव्हाण, संघटक राजेश टोपे, किरण थोरवे, अंकुश परांडे, उमेश देसाई, टाव्हरे, महिला संघटकमोहिनी कोळी, पवन टिंगरे, विशाल टेकाळे, विनोद टोपे तसेच मोठ्या संख्येने केमिस्ट बंधू-भगिनी उपस्थित होते.

फार्मासिस्ट म्हणून कार्यरत असलेल्या महापौर लांडगे यांच्या निवडीमुळे पिंपरी चिंचवडमधील औषध विक्रेते व केमिस्ट बंधू-भगिनींमध्ये आनंदाचे वातावरण असून, हा क्षण केमिस्ट क्षेत्रासाठी अभिमानास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# १३ कोटींचे व्हीएमडी प्रकल्प कालबाह्य, उत्पन्न केवळ ६० लाख

पिंपरी (दै. संध्या) :



पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीने तब्बल 13 कोटी रुपये खर्च करून शहरभरात लावलेले 60 व्हेरिबेल मेसेजिंग डिस्प्ले सिस्टीम (व्हीएमडी) कालबाह्य (आऊटडेटेड) झाले आहेत. जाहिराती प्रसिद्ध करणाऱ्यांसाठी लावलेले ते व्हीएमडी जुन्या तंत्रज्ञानामुळे आता उपयुक्त राहिलेले नाहीत. त्या माध्यमातून पाच वर्षांत केवळ 60 लाखांचे अल्प उत्पन्न मिळाले आहे. परिणामी, त्याचा खर्च पाण्यात गेल्याचे स्पष्ट होत आहे. केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियानातून नवी मुंबई महापालिका बाहेर पडल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेचा त्या महापालिकेच्या जागी 13 जुलै 2017 ला समावेश करण्यात आला. जाहिरातीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळेल, या हेतूने स्मार्ट सिटी कंपनीने पॅन सिटीअंतर्गत सन 2021 व 2022 मध्ये शहरभरातील 60 ठिकाणी व्हीएमडी उभारले गेले. त्यासाठी एकूण 12 कोटी 74 लाख 4 हजार 300 रुपये खर्च करण्यात आला. एक व्हीएमडी 21 लाख 23 हजार 405 रुपयांचा आहे. ते काम लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड या ठेकेदार कंपनीने केले. त्यांची देखभाल व दुरुस्ती तीच कंपनी करत आहे.

# पिंपरी-चिंचवड शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद

## नागरिकांची सुरक्षितता धोक्यात



पिंपरी (दै. संध्या) :

■ सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने सुरू करण्याची नगरसेवक विनोद नढे यांची मागणी

पिंपरी चिंचवड शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी अनेक कॅमेरे सध्या बंद अवस्थेत असल्याचा गंभीर मुद्दा समोर आला आहे. यासंदर्भात माजी विरोधी पक्षनेते नगरसेवक विनोद जयवंत नढे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन दिले आहे. शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने सुरू करण्याची मागणी विनोद नढे यांनी केली आहे.

शहरात महापालिका व स्मार्ट सिटी उपक्रमांतर्गत विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र, सध्या अनेक कॅमेरे कार्यरत नसल्याने गुन्हे तपासात अडथळे निर्माण होत असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

**नगरसेवक विनोद नढे यांनी खालील मुद्द्यांवर माहिती मागवली आहे.**

- ▲ शहरात एकूण किती सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत आणि किती बंद आहेत?
- ▲ बंद कॅमेरे दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाने कोणती पावले उचलली आहेत?
- ▲ कॅमेऱ्यांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी कोणत्या ठेकेदाराकडे आहे? संबंधित कंपनीचे नाव काय?
- ▲ या प्रकल्पासाठी किती निधी खर्च करण्यात आला असून किती रकमेचे वर्क ऑर्डर देण्यात आले आहेत?
- ▲ ठेकेदाराला आतापर्यंत किती देयके अदा करण्यात आली? त्याचे बिल तपशील काय?
- ▲ करारातील अटींनुसार देखभाल न झाल्यास कोणती दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे?

"सीसीटीव्ही यंत्रणा बंद राहणे म्हणजे शहराची सुरक्षितता धोक्यात आहे. याबाबत तातडीने उपाययोजना करून सर्व कॅमेरे कार्यरत करावेत," अशी मागणी विनोद नढे यांनी केली आहे. दरम्यान, या निवेदनानंतर महापालिका प्रशासनाकडून नेमकी काय भूमिका घेतली जाते आणि बंद कॅमेरे पुन्हा कार्यरत करण्यासाठी कोणती पावले उचलली जातात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर 25 फेब्रुवारी ते 1 मार्च दरम्यान 'पवनाथडी जत्रा'

पिंपरी(दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या समाज विकास विभागामार्फत दि. २५ फेब्रुवारी २०२६ ते १ मार्च २०२६ या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर 'पवनाथडी जत्रा'चे आयोजन करण्यात आले आहे. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्यांचा विकास करणे तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरा आणि शहरी संस्कृतीचे जतन करणे हा या जत्रेचा मुख्य उद्देश आहे. महापालिकेच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारी पवनाथडी जत्रा ही महिला उद्योजिकांसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरत असून विविध हस्तकला, खाद्यपदार्थ, गृहउद्योग उत्पादने आणि पारंपरिक वस्तूंचे प्रदर्शन व विक्री यामध्ये केली जाते. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जत्रेसाठी सहभाग अर्जांचे वाटप व स्वीकृती दि. १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर अर्ज समाज विकास विभागाकडे सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत उपलब्ध आहेत. या जत्रेकरिता जनरल, व्हेज आणि नॉन व्हेज या तीन प्रकारात स्टॉल वाटप करण्यात येणार आहेत. सहभागासाठी बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र, संबंधित महिलेचे आधार कार्ड, बँक पासबुकची प्रत व फोटो ही कागदपत्रे आवश्यक आहेत. दि.१० फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुमारे २,५०० अर्ज महिला बचत गट, मा. खासदार, मा. आमदार व मा. नगरसेवक यांच्याकडे वाटप करण्यात आले असून त्यापैकी १६८ अर्ज समाज विकास विभागाकडे प्राप्त झाले आहेत. अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख दि. १८ फेब्रुवारी २०२६ आहे.

### शासनाच्या समितीकडून निळ्या आणि लाल पूररेषांचे पुन:सर्वेक्षण : आ. शंकर जगताप

पिंपरी(दैनिक संध्या) : निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये नद्यांलगतच्या निळ्या व लाल पुररेषेचे नव्याने पुनर्वेक्षण करण्यासाठी शासनाकडून नियमावली तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी सरकारने पिंपरी चिंचवडसह १२ सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली. दरम्यान गठीत केलेली समिती पुढील दोन महिन्यात शासनाला अहवाल सादर आहे. पिंपरी चिंचवडसह राज्यात प्रमुख शहरांमध्ये नद्यालगतच्या निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भातले प्रश्न प्रलंबित आहेत. यामुळे नागरिकांना अडचणी निर्माण होत होत्या. पिंपरी चिंचवड मधील पवना, इंद्रायणी आणि मुळा नद्यांच्या निळ्या पूररेषेत झालेली अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामे हा मुख्य प्रश्न आहे. यासाठी आमदार शंकर जगताप यांच्या माध्यमातून वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दि २५ मार्च २०२५ रोजी (लक्षवेधी सूचना क्रमांक १९४६) मांडतांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे समिती नेमण्याची मागणी केली होती. दरम्यान नुकत्याच झालेल्या पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. १० जानेवारी २०२६ रोजी आकुर्डी येथे झालेल्या सभेमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात नव्याने सर्वेक्षण केले जाईल असे सांगितले होते.

# शिवजयंतीनिमित्त रहाटणी, पिंपळे सौदागर येथील वाहतूकीत बदल



पिंपरी (दै. संध्या) :

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी २०२६ रोजी रहाटणी गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने त्या परिसरात वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. हा आदेश पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेकडून जारी करण्यात आला आहे.

कार्यक्रमादरम्यान सायंकाळी ५.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत (अत्यावश्यक सेवांतील वाहने वगळता) सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध लागू असतील. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**बदल करण्यात आलेले मार्ग पुढीलप्रमाणे :**

- ■ रहाटणी फाटा चौकातून गोविंद चौकाकडे जाणाऱ्या सर्व जड व अवजड वाहनांना मनाई करण्यात आली आहे.
- ■ पर्यायी मार्ग : काळेवाडी फाटा मार्गे इच्छित स्थळी जाता येईल.
- ■ गोविंद चौकातून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक (रहाटणी गाव) बाजूकडे येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेशबंदी राहील.
- ■ पर्यायी मार्ग : गोविंद चौक ते कोकणे चौक मार्गे वळविण्यात येईल.
- ■ महादेव मंदिर/पिंपळे सौदागर पोलीस चौकी टी-पॉइंटकडून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही.
- ■ पर्यायी मार्ग : महादेव मंदिर/पिंपळे सौदागर पोलीस चौकी येथून पी. के. चौक मार्गे वाहतूक वळविण्यात येईल.
- ■ जीवन ज्योती हॉस्पिटलजवळील टी-पॉइंटकडून पुतळा चौकाकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेशबंदी राहील.
- ■ पर्यायी मार्ग : जीवन ज्योती हॉस्पिटलजवळील टी-पॉइंट ते पी. के. चौक मार्गे वाहतूक सुरू राहील.
- ■ वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे व दिलेल्या पर्यायी मार्गांचा अवलंब करावा, असे आवाहन पोलिस उपायुक्त (वाहतूक) यांनी केले आहे.

# शिरोळे रोडवरील पदपथ अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांची सुरक्षा धोक्यात

पिंपरी (दै. संध्या) :

नवी सांगवी परिसरातील शिरोळे रोडवर व्यापाऱ्यांनी पदपथांवर मोठे काउंटर, फर्निचर व जाहिरातीचे स्टॅण्ड ठेवून केलेल्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांचे हाल होत असून, त्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. बहुतांश पदपथांवर व्यावसायिकांनी आधीच वर्दळीचा असलेला हा रस्ता अतिक्रमण आणि अनधिकृत पार्किंगच्या विळख्यात सापडला आहे. शिरोळे रोड हा परिसरातील प्रमुख मार्ग असून, कृष्णा चौकातील सिग्नलमुळे येथे दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा परिस्थितीत पदपथांवर व्यापाऱ्यांनी ठेवलेले साहित्य आणि रस्त्यालगत केलेले अनधिकृत पार्किंग यामुळे पदपथ पादचाऱ्यांना वापरता येत नाहीत. परिणामी नागरिकांना जीव धोक्यात घालून वाहनांच्या गर्दीतून रस्त्यावरून चालावे लागत आहे. विशेष म्हणजे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना रस्त्यावरून चालण्याची वेळ येत असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात दुकाने असून, दिवसभर खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी असते. अनेक वाहनचालक रस्त्यावरच गाड्या पार्क करत असल्याने वाहतूककोंडी होत आहे. अनधिकृत पार्किंगमुळे पदपथांवरील अतिक्रमणाचा विळखा अधिकच घट्ट झाला आहे.

# माझी वसुंधरा अभियानात पिंपरी चिंचवड महापालिका राज्यात सर्वप्रथम



पिंपरी (दै. संध्या) :

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' च्या राज्यस्तरीय अंतिम निकालात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटात पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रथम क्रमांक पटकावून राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. तसेच भूमी विषयांतर्गत महापालिकेने उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे.

अभियान कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे डेस्कटॉप मूल्यांकन व फिल्ड मूल्यांकन करण्यात आले. दोन्ही मूल्यांकनांमधील एकूण गुणांच्या आधारे राज्यातील १४ गटांतील विजेत्यांची निवड शासन मान्यतेनंतर जाहीर करण्यात आली. या प्रक्रियेत पिंपरी चिंचवड महापालिकेने पर्यावरण संरक्षण, हरित उपक्रम, कचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन, ऊर्जा बचत आणि जनजागृती यामध्ये प्रभावी कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला आहे.

महापालिकेने शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व संवर्धन, प्लास्टिक निर्मूलन उपक्रम, जलसंधारण प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन सुधारणा, हरित शाळा उपक्रम, सौरऊर्जा प्रकल्प, तसेच नागरिकांच्या सक्रिय सहभागातून विविध पर्यावरणपूरक मोहिमा राबवल्या आहेत. नागरिक, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक आस्थापनांच्या सहभागामुळे अभियानाला व्यापक यश मिळाले. या यशाबद्दल महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त डॉ.प्रदीप ठेंगल यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचे अभिनंदन केले. राज्यस्तरावर मिळालेल्या या मानांकनामुळे पिंपरी चिंचवड शहराची पर्यावरणपूरक शहर म्हणून ओळख अधिक बळकट झाली आहे. आगामी काळात 'माझी वसुंधरा ६.० अभियान' ही देखील अधिक व्यापक स्वरूपात राबवून हरित, स्वच्छ आणि शाश्वत शहर घडविण्याचा महापालिकेचा संकल्प आहे.

माझी वसुंधरा ५.० अभियानामध्ये मिळालेला प्रथम क्रमांक हा महापालिकेच्या सर्व विभागांच्या समन्वयित कामकाजाचा आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागाचा परिणाम आहे. पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि हरित उपक्रमांना प्राधान्य देत आम्ही पुढील काळात अधिक तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि परिणामकारक प्रकल्प राबवू. 'माझी वसुंधरा ६.०' अंतर्गत अधिक व्यापक नियोजन करून पिंपरी चिंचवड शहराला पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने पुढे नेण्याचा आमचा निर्धार आहे.

**- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका**

माझी वसुंधरा ५.० अभियानात मिळालेले यश हे पिंपरी चिंचवड शहराचे असून, पर्यावरण संवर्धनासाठी पिंपरी चिंचवड शहर कटिबद्ध असून भविष्यातही अधिक प्रभावी उपक्रम राबविण्यात येतील. आगामी काळात तंत्रज्ञानाधारित उपाययोजना आणि नवकल्पना यांना अधिक चालना देण्यात येईल.

**– श्रावण हर्डीकर , आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

माझी वसुंधरा अभियानामध्ये राबविण्यात आलेले विविध हरित प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापनातील सुधारणा आणि ऊर्जा बचतीसंदर्भातील उपक्रम यांचा एकत्रित परिणाम म्हणून हे यश मिळाले आहे. प्रशासनातील सर्व विभागांनी समन्वय राखत नियोजनबद्ध पद्धतीने काम केले.

**— विजयकुमार खोराटे,अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

पर्यावरण संवर्धन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. 'माझी वसुंधरा ५.०' अंतर्गत जनजागृती, प्लास्टिक निर्मूलन, जलसंधारण आणि हरित उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**– डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त,पिंपरी चिंचवड महापालिका.**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

भिवंडी (दैनिक संध्या) : क्षयरोग निर्मूलनासाठी खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांची कर्तव्य व जबाबदाऱ्यांसंदर्भात नुकतेच प्रशिक्षण कार्यशाळा कार्यक्रमाचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या क्षयरोग विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम Doctor For You (DFY) या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची अध्यक्षता वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर यांनी केली. तसेच शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद, RCH अधिकारी डॉ. वर्षा बारोड, WHO कन्सल्टंट डॉ. ज्योती साळवे तसेच छाती तज्ञ डॉ. विक्रम जैन यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेमध्ये राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम (NTEP) अंतर्गत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांची भूमिका व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच TB Notification, MDR-TB, कॉन्टॅक्ट ट्रेसिंग, निक्षय मित्र योजना आणि Presumptive TB Cases यांसंदर्भात चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले. भिवंडी मनपा शहरातील IGM hospital चे छाती तज्ञ डॉ. मो. अली धुरु तसेच अनेक खाजगी वैद्यकीय व्यावसायिक या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच NTEP व DFY संस्थेचे सर्व सुपरवायझर व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.




### माझी वसुंधरा अभियानात आळंदीला चौथा क्रमांक; 75 लाखांचे बक्षीस जाहीर

आळंदी (दैनिक संध्या) : राज्य शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान' स्पर्धेत आळंदी नगर परिषदेला पुणे विभागात चौथा क्रमांक मिळाला आहे. या यशाबद्दल ७५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. पर्यावरण संवर्धनाच्या विविध घटकांमध्ये केलेल्या नियोजनबद्ध आणि परिणामकारक कामगिरीमुळे आळंदीला हा मान मिळाला. माझी वसुंधरा अभियान अंतर्गत दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामांचे मूल्यमापन केले जाते.भूमी, वायू, आकाश, जल आणि अग्नी या पंचमहाभूतांशी संबंधित उपक्रमांच्या अंमलबजावणीवर भर दिला जातो. शाश्वत विकास आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्याचा या स्पर्धेचा उद्देश आहे. आळंदी नगर परिषदेकडून हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी वृक्षारोपण, वाहन प्रदूषण नियंत्रण, हरित क्षेत्र वाढविणे आणि स्वच्छ ऊर्जेचा वापर यावर भर देण्यात आला. जलसंधारणासाठी पावसाचे पाणी साठवण, जलस्रोत स्वच्छता आणि पाणी पुनर्वापर उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. घनकचरा व्यवस्थापनात प्लास्टिक निर्मूलन, स्वच्छता मोहीम आणि कंपोस्टिंगला चालना देण्यात आली. तसेच सौर ऊर्जा प्रकल्प, एलईडी दिव्यांचा वापर आणि पर्यायी ऊर्जास्रोतांचा प्रचार यांसारख्या ऊर्जाबचतीच्या उपाययोजनाही करण्यात आल्या. जैवविविधता संवर्धनासाठी स्थानिक वनस्पती व प्राण्यांचे संरक्षण, जैवविविधता उद्याने आणि निसर्ग संवर्धन उपक्रम राबविण्यात आले. यासर्व बाबींच्या गुणांकनानुसार आळंदीला पुणे विभागात चौथा क्रमांक निश्चित करण्यात आला. या यशामुळे शहराच्या पर्यावरणपूरक वाटचालीला नवी दिशा मिळाली असून, भविष्यातही अशाच उपक्रमांना अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



### नगराध्यक्षा मनिषाताई गोरे यांना सावित्रीमाई फुले महिला भूषण पुरस्कार

चाकण (दैनिक संध्या) : महात्मा फुले मंडळ चिंचवड यांच्या वतीने २०२६ चा सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्त दरवर्षी विविध सामाजिक, शैक्षणिक, आध्यत्मिक, कृषी, उद्योग, शासकीय आणि राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्ते यांचा सन्मान केला जातो. महात्मा फुले मंडळ चिंचवडचे हे २२ वे वर्ष आहे. महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमारजी गोरे, ओबीसी विकास व दुग्ध विकासमंत्री अतुलजी सावे यांच्या हस्ते संसदरत्न खासदार श्रीरंगजी बारणे, आमदार शंकर जगताप, यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान झाला. तसेच पिंपरी - चिंचवड शहर नवनिर्वाचित नगरसेवक यांना ही सन्मानित करण्यात आले व चाकण नगरपरिषदेवर बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीनभाऊ गोरे यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी महापौर रविभाऊ लांडगे, वसंतनाना लोंढे, माजी महापौर अपर्णा डोके, शहराध्यक्षा कविता आल्हाट, नगरसेवक राहुलदादा जाधव, महात्मा फुले मंडळ अध्यक्ष हनुमंतराव माळी, कार्याध्यक्ष अनिल साळूंखे, उपाध्यक्ष ह.भ.प.महादेवमहाराज भुजबळ, खजिनदार सूर्यकांत ताम्हाणे, विकास गोरे, प्रमिला गोरे, माधुरी गोरे, सिद्धी तळेकर, उर्मिला भुजबळ आदी उपस्थित होते. मनिषाताई गोरे यांनी यावेळी सांगितले की, " क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले यांच्या कार्यामुळे बहुजन समाज विकासाभिमुख झाला. त्यांची प्रेरणा व स्मरण हे आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यामुळेच महिलांचे सक्षमीकरण झाले. आज प्रत्येक क्षेत्रात महिला खाद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. यावर्षीचा सावित्रीमाई फुले महिला भूषण पुरस्कार आई - वडील, सासू - सासरे, पती सुरेशभाऊ गोरे, गोरे परिवार आणि स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठान खेड तालुका यांच्या वतीने समस्त चाकणकर नागरिकांना समर्पित केला आहे. महात्मा फुले मंडळ चिंचवडचे ऋण व्यक्त करून त्यांना पुढील वाटचालीस सदिच्छा व शुभेच्छा दिल्या.



## भैरवनाथ पतसंस्थेच्या वतीने नगराध्यक्षा मनिषा गोरे यांचा सन्मान

**चाकण (दै. संध्या)**

श्री भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्थेच्या येथील शाखेच्या वतीने चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांचा पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. भैरवनाथ पतसंस्थेच्या वतीने येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात आढळराव पाटील, राखी वखारिया, शितल सातकर, अंकिता दैने, राखी खिलारी, अनिकेत काळे, शिवदास शेवाळे, प्रसाद सातकर आदींच्या हस्ते नगराध्यक्षा मनिषा गोरे यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष सागर काजळे, संचालक कल्पना आढळराव पाटील, योगेश बाणखेले, अभिमन्यू लांडगे, राम गावडे, महेश ढमढेरे, हनुमंत तागड, शोभा आवटे, राम तोडकर, भिकाजी बोकड, अशोक गव्हाणे, अंजली थोरात, रामदास पवळे हे संचालक तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश खरमाळे, नगरसेवक नितीन गोरे, उद्योजक अशोक भुजबळ, पांडुरंग गोरे, सत्यवान गोरे आदी उपस्थित होते. आढळराव पाटील यांनी यावेळी नगराध्यक्षा मनिषा गोरे व नगरसेवक नितीन गोरे यांच्या कामाचे कौतुक केले. मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश खरमाळे व उपाध्यक्ष सागर काजळे यांनी स्वागत केले.

## विद्यालयातून मिळालेले संस्कार, शिस्त व मूल्ये हीच खरी संपती : स. तु. पिसाळ

**जेजुरी (दै. संध्या)**



हरणी (ता. पुरंदर) येथील हरणी माध्यमिक विद्यालयात मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ह.भ.प. रमेश महाराज यादव यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सरस्वती माता तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. चंदुकाका जगताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प व लेखनी देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून विद्यालयातील आठवणींना उजाळा देत उज्वल यशाची परंपरा कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला. इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनीही दहावीच्या विद्यार्थ्यांना एस.एस.सी. बोर्ड परीक्षेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाचे मुख्याध्यापक सतीश पिसाळ यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "विद्यालयातून मिळालेले संस्कार, शिस्त आणि मूल्ये हीच तुमची खरी संपत्ती आहे. ती आयुष्यभर जपली तर यश तुमच्या पावलांशी येईल." तसेच त्यांनी पुढे म्हटले, "मोठी स्वप्ने पाहा, त्यासाठी सातत्याने प्रयत्न करा आणि अपयश आले तरी खचू नका, कारण अपयश हीच यशाची पहिली पायरी असते."ते पुढे म्हणाले की "आई-वडील, गुरुजन आणि समाज यांचा आदर करा. चांगले नागरिक बनणे हेच खरे शिक्षण आहे." तसेच विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार, वेळेचे नियोजन आणि प्रामाणिक परिश्रम यांचे महत्त्व पटवून देत त्यांनी उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

शिक्षक प्रतिनिधी म्हणून बाळासाहेब पठारे, कदम मॅडम, अंकिता नाकाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर शुभेच्छा दिल्या.

ग्रामस्थांमधून अमोल यादव, नितीन यादव, सरपंच धनंजय यादव, हनुमंत यादव व विजय बापू यादव यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात ह.भ.प. रमेश यादव महाराज यांनी शिक्षणासोबत अध्यात्माची सांगड घालून जीवनात यशस्वी होण्याचा संदेश दिला. कार्यक्रमासाठी एकनाथ यादव, देविदास यादव, तात्याबा यादव, दादासो यादव, सदाशिव यादव, विठ्ठल यादव, अशोक यादव व महादेव यादव यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोरक्षनाथ जामदार, दिगंबर जगताप, आर. व्ही. जगताप, विजय जगताप, श्रीकांत जगताप व लिलाचंद साळवी यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी यादव व अमृता यादव यांनी केले, तर आभार प्रदर्शन साक्षी यादव हिने मानले.

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त व्याख्यानमाला; विज्ञानप्रेमींनी लाभ घ्यावा – डॉ. तानाजी वामन

**जुन्नर (दै. संध्या)**

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या औचित्याने माशेलकर–स्वरूप स्पेस अँड इनोवेशन सेंटर, नारायणगाव यांच्या वतीने जुन्नर तालुक्यातील दहा शाळांमध्ये तीन दिवसीय विज्ञान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेत ५००० हून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि विज्ञानप्रेमी सहभागी होणार असल्याची माहिती केंद्राचे सचिव डॉ. रतिलाल बाबेल यांनी दिली.

दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण यांच्या 'रमण प्रभाव' शोधाच्या स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. त्यानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, संशोधनाची आवड वाढावी आणि विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित व्हावे या उद्देशाने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे युवा शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्रतिक मुणगेकर (FRSA) हे २६ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान विविध शाळांमध्ये मार्गदर्शन करणार आहेत. विज्ञान व समाज, वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज, कृत्रिम बुद्धिमत्ता, अवकाश संशोधन, शास्त्रज्ञ होण्यासाठी आवश्यक कौशल्ये, संशोधनाचे महत्त्व अशा विविध विषयांवर ते विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नोत्तरांसाठी विशेष वेळ राखीव ठेवण्यात आला आहे.

ही व्याख्यानमाला श्री चैतन्य विद्यालय ओतूर, श्री गाडगे महाराज विद्यालय, श्री गाडगे महाराज आश्रम शाळा, सावित्रीबाई फुले कन्या शाळा ओतूर, जयहिंद पॉलीटेक्निक, जयहिंद इंटरनॅशनल स्कूल, श्री ज्ञानेश्वर विद्यालय सावरगाव, शिवनेरी स्कूल व ज्युनिअर कॉलेज खानापूर, तसेच शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा सोमतवाडी आदी ठिकाणी होणार आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी उपाध्यक्ष डॉ. तानाजी वामन, डॉ. कल्पेश जाधव, डॉ. रतिलाल बाबेल आणि सौ. अक्षदा बाबेल यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक आणि विज्ञानप्रेमींनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. तानाजी वामन यांनी केले आहे.

## येत्या काळात करियरच्या दृष्टीने खेळाकडे पाहिले जाईल

**पुणे (दै. संध्या)**

'आपण मुलांना सहजच खेळायला काय जातो अभ्यास कर असे म्हणतो. कारण अभ्यास हा करिअरसोबत जोडला गेला आहे. मात्र, आता केंद्र सरकार खेळाला विविध योजनांच्या माध्यमातून बळ देत आहे. त्यामुळे येत्या ५ ते १० वर्षांत अभ्यासाप्रमाणेच खेळाकडेही करिअर घडवण्याचा पर्याय म्हणून याकडे पाहिले जाईल' असा विश्वास केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी व्यक्त केला.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित वार्तालापात त्यांनी केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून खेळासाठी प्रोत्साहन देत असलेल्या योजनांबद्दल त्यांनी संवाद साधला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले उपस्थित होते. खडसे यांनी युवक सक्षमीकरण आणि क्रीडा क्षेत्रातील आगामी धोरणांवर सविस्तर भूमिका मांडली.

## बिनविरोध नगरसेवक नितीनभाऊ गोरे यांचा सन्मान




**चाकण (दै. संध्या)**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक नितीन भाऊ गोरे यांची चाकण नगरपरिषदेच्या नगरसेवकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल महात्मा फुले मंडळाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक, आध्यत्मिक, कृषी, उद्योग, आणि राजकीय क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा महात्मा फुले मंडळाच्या वतीने गौरव करण्यात येतो. चाकण नगरपरिषदेच्या नगरसेवक पदी नितीन गोरे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ओबीसी विकास व दुग्ध विकासमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते गोरे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी संसदरत्न खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, महापौर रवींद्र लांडगे, वसंत लोंढे, माजी महापौर अपर्णा डोके, शहराध्यक्षा कविता आल्हाट, नगरसेवक राहुल जाधव, महात्मा फुले मंडळाचे अध्यक्ष हनुमंत माळी, कार्याध्यक्ष अनिल साळूंखे, उपाध्यक्ष हभप महादेव महाराज भुजबळ, खजिनदार सूर्यकांत ताम्हाणे, विकास गोरे, प्रमिला गोरे, माधुरी गोरे, सिद्धी तळेकर, उर्मिला भुजबळ आदी उपस्थित होते.

## अध्यात्मिक उन्नतीसाठी महाशिवरात्री व्रत महत्त्वाचे – डॉ. रवींद्र भोळे

### वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व प्रवचन सोहळा संपन्न

**पुरंदर (दै. संध्या)**



महाशिवरात्री हा दिवस साधकांसाठी स्फूर्तीदायक असून अध्यात्मिक उन्नतीसाठी या व्रताचे विशेष महत्त्व आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार ह.भ.प. डॉ. रवींद्र भोळे यांनी केले. वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिरात आयोजित महाशिवरात्री अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्यात ते बोलत होते.

डॉ. भोळे म्हणाले, महाशिवरात्रीच्या दिवशी नवीन चेतना निर्माण होते. संसारातील दुःखरूपी विष सहन करून सकारात्मकतेने पुढे जाण्याची प्रेरणा या पर्वातून मिळते. नवोदित वधू-वरांसाठीही हा दिवस जीवनातील तडजोडी व समन्वय शिकवणारा ठरतो. योग्य साधकांना या दिवशी योगसामर्थ्य प्राप्त होते.

सह्याद्रीच्या कुशीतील नैसर्गिक अरण्यात वसलेले वाघापूर येथील श्री माणकेश्वर मंदिर अत्यंत प्राचीन व जागृत देवस्थान असल्याचेही त्यांनी नमूद केले. नवनाथांपैकी अडबंगनाथ यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाल्याची श्रद्धा असून येथे केलेली साधना फलदायी ठरते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी पोलीस अधिकारी कृष्णाजी इंदलकर, अर्जुन भाऊ फौजी, ह.भ.प. बापूसो गायकवाड महाराज, देवेंद्र पांडुरंग कुंजीर, विजय तुकाराम कुंजीर, वसंत गुरुजी, रोहिदास कुंजीर, रामदास आप्पा, कैलास तात्या, बाजीराव नाना कुंजीर, अरुण तात्या, रामचंद्र कुंजीर, अशोक कुंजीर, गौतम दादा कुंजीर, मच्छिंद्र कुंजीर, दादा कुंजीर, बापू कुंजीर, योगेश कड, रवानाना कुंजीर, माऊली इंदुलकर, संतोष कुंजीर, नारायण देव तसेच वाघापूरच्या सरपंच सौ. दिपाली कुंजीर, सौ. सविता कुंजीर, सौ. दीक्षित बाई, सौ. विजयंता इंदलकर, सौ. सुमनताई वाईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. अनंता महाराज परदेशी, ह.भ.प. सतीश महाराज खोमणे, ह.भ.प. झाडे महाराज, ह.भ.प. शिवाजी महाराज पवार, ह.भ.प. श्रीपाद महाराज जाधव तसेच वारकरी भूषण ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांची सुश्राव्य कीर्तने झाली. तसेच दिव्यानंदगिरी मौनगिरी महाराज यांनी शिवपुराणावर आधारित प्रवचन केले.

श्री माणकेश्वर महाशिवरात्री अखंड हरिनाम सप्ताहाचे हे सतरावे वर्ष असून समस्त ग्रामस्थ व मंदिर समितीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर मोठ्या भक्तिभावाने धार्मिक सोहळा संपन्न झाला.

## चांडोली खुर्दचे उपसरपंच अमोल दाभाडे यांचे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित

**आंबेगाव (दै. संध्या)**




आंबेगाव तालुक्यातील चांडोली खुर्द गावातील गायरान जमिनीवर प्रस्तावित मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाच्या संदर्भात ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. संबंधित सौर प्रकल्पासाठी सुमारे १२.८ हेक्टर गायरान जमीन संपादन करण्यात आली होती. ग्रामसभेने केवळ २.०० हेक्टर जमीन देण्याचा ठराव मंजूर केलेला असताना उर्वरित संपूर्ण जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. ग्रामस्थांच्या मते, उर्वरित जमीन ही भविष्यातील गावठाण विस्तार, भूमिहीन कुटुंबांना घरकुल, स्मशानभूमी, शैक्षणिक व आरोग्य सुविधा तसेच इतर मूलभूत गरजांसाठी अत्यावश्यक आहे.

दरम्यान, संबंधित सौर प्रकल्पासाठी काम करणाऱ्या आवादा कंपनीने ग्रामस्थांना विश्वासात न घेता व त्यांच्या भावनांचा विचार न करता जबरदस्तीने काम सुरू केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गायरान जागेत पन्नास वर्षापेक्षा अधिक काळ राहणाऱ्या पारधी समाजाच्या झोपड्या तोडण्यात आल्या होत्या तसेच कंपनीच्या काही प्रतिनिधींनी स्थानिक ग्रामस्थांना वारंवार धमक्या दिल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या आहेत. यामुळे गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्यांसाठी चांडोली खुर्द गावचे उपसरपंच श्री.अमोल दाभाडे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेत आंबेगाव तालुक्यातील सर्व पक्षांचे प्रमुख नेते आंदोलन स्थळी दिवसभर उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी श्री. गोविंद जाधव यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधल्यानंतर आंबेगावचे तहसीलदार डॉ.सचिन वाघ चांडोली खुर्द येथे दाखल झाले.

भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे मा.अध्यक्ष देवदत्त निकम, शिवसेना जिल्हाप्रमुख देविदास दरेकर, युवासेना कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर, जिल्हा परिषद सदस्य विष्णुकाका हिंगे, पंचायत समिती सदस्य शिवाजीराव निघोट, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विजयराव पवार, डॉ.ताराचंद कराळे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रविण थोरात पाटील, उद्योजक संजयशेठ थोरात, चांडोली खुर्द गावच्या सरपंच प्रियांका भागीत, मा.सरपंच बी.टी.बांगर, निरगुडसरचे सरपंच रविंद्र वळसे पाटील, शिवसेना नेते मनोहर इंदोरे, महेंद्र बांगर यांच्यासह मोठ्या संख्येने चांडोली खुर्द गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

आंदोलकांचा आक्रमक पवित्रा, गावची भविष्यातील गरज, ठेकेदाराची मुजोरी या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली व ग्रामस्थांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करण्यात येईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. संबंधित ठेकेदार व ऊर्जा विभागाला पुढील आदेश येईपर्यंत काम थांबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. यानंतर तहसीलदार यांनी लेखी आश्वासन देऊन संबंधित सर्व प्रश्न सोडविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, तसेच जिल्हाधिकारी, प्रांत व स्थानिक ग्रामस्थ यांच्या उपास्थितीत वरिष्ठ स्तरावर बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल, असे स्पष्ट केले. प्रशासनाच्या या लेखी आश्वासनानंतर व ग्रामस्थांच्या हिताचा विचार होईल या विश्वासातून उपसरपंच श्री. अमोल दाभाडे यांनी ग्रामस्थांच्या उपस्थितीत आमरण उपोषण स्थगित केले आहे. ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे की, न्याय्य मागण्या पूर्ण न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.



# विद्यार्थ्यांचा शुभचिंतन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**जेजुरी (दै. संध्या) :**

खळद तालुका पुरंदर येथील श्री शिवशंभो माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन कार्यक्रम विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. याच वेळी संस्थेच्या अध्यक्षा आनंदी काकी जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाल संस्कार केंद्र, अंबोडीचे संस्थापक स्वप्निल महाराज काळाने हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. दशरथ महाराज कादबाने, खळद गावच्या सरपंच रोहिणी ताई योगेश कामथे, पत्रकार योगेश कामथे, चंद्रकांत आमथे, रामदास कामथे, भाऊसाहेब कामथे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

याप्रसंगी सुरेश कामथे, सोपान कामथे, प्रकाश कामथे, उमेश जावळे हे मान्यवर पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक हरिभाऊ टापरे यांनी केले. विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा वसा घेऊन आपले जीवन आनंदी व यशस्वी करावे तसेच भविष्यात शाळेला विसरू नये, असे प्रेरणादायी विचार त्यांनी व्यक्त केले.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत मनोगत व्यक्त केले. शिक्षक प्रतिनिधी रमेश बोरावके यांनी विद्यार्थ्यांना सुसंस्कारक्षम बनण्याचे आवाहन करत, "शिका, मोठे व्हा आणि शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल करा," असे मार्गदर्शन केले.

योगेश कामथे व रोहिणी ताई कामथे यांनीही दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे ह.भ.प. दशरथ महाराज कादबाने यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त करत यंदाचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

मुंबई सेकंडरी स्कूल अँड एम्प्लॉईज पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे यांच्या वतीने विद्यालयास भिंतीवरील मोठे घड्याळ भेट देण्यात आले. तसेच राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वप्निल महाराज काळाने यांनी माऊलींच्या दाखल्यांसह विद्यार्थ्यांना गुणसंपन्न व आरोग्यसंपन्न जीवन जगण्याचे मार्गदर्शन केले. "स्वतःच्या कर्तृत्वाने शाळेचे, गावाचे व कुटुंबाचे नाव उज्ज्वल करा," असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे नियोजन दिलीप जगताप, रामचंद्र कामठे, प्रल्हाद कारकर, सायली गोरे, सुस्मिता चव्हाण, उत्कर्षा फुले, प्रकाश हांडे, वैजयंता मांढरे, बाळासाहेब खळदकर, बाबुराव गायकवाड व प्रमोद यादव यांनी केले. सूत्रसंचालन हिंदवी कामथे व नेहा कामथे यांनी केले.

कार्यक्रमामुळे दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा, मार्गदर्शन व शुभेच्छांचा अमूल्य ठेवा मिळाला.

# पारंपारिक वाद्यांच्या साथीने शिवजयंती साजरी करा

## पोलीस उपनिरीक्षक नामदेव तारडे यांचे आवाहन

**जेजुरी (दै. संध्या)**

छत्रपती शिवाजी महाराजांनी आदर्श राज्यकारभारातून शिस्त, लोककल्याण आणि सामाजिक जबाबदारीचा आदर्श घालून दिला. त्यांच्या विचारांचे स्मरण ठेवत शिवजयंती उत्सव साजरा करताना तरुणांनी पारंपारिक पद्धतीचा अवलंब करून समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे आवाहन जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नामदेव तारडे यांनी केले.

१९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर जेजुरी पोलीस स्टेशनच्या मल्हार सभागृहात पोलीस पाटील व शिवजयंती उत्सव समिती पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील विविध गावांतील पोलीस पाटील, तरुण मंडळांचे प्रतिनिधी आणि उत्सव समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत कायदा व सुव्यवस्था राखत शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने शिवजयंती साजरी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी बोलताना उपनिरीक्षक तारडे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याला जनतेच्या गवताच्या पात्यालाही धक्का लागू नये, अशी कठोर शिस्त दिली होती. त्यामुळे जयंती उत्सव साजरा करताना त्यांच्या आदर्शांचे पालन करणे आवश्यक आहे. तरुणांनी डीजे



किंवा धांगडधिंगा टाळून पारंपारिक वाद्यांच्या साथीने मिरवणुका काढाव्यात तसेच व्याख्याने, पोवाडे, ऐतिहासिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करून शिवचरित्र जनतेपर्यंत पोहोचवावे, असे त्यांनी सांगितले. कोणत्याही मंडळाने परवानगीशिवाय वाद्यांचा वापर करू नये, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीस पोलीस पाटील संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष विजय कुंजीर, तालुका अध्यक्ष मोहन इंगळे यांच्यासह विविध गावांतील पोलीस पाटील व तरुण मंडळांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, पोलीस निरीक्षक दिपाली पवार यांनीही तरुणांना सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवण्याचे आवाहन केले. शिवजयंती निमित्त वृक्षारोपण, शैक्षणिक व समाजोपयोगी उपक्रम राबवावेत तसेच उत्सवासाठी जमा होणारा निधी समाजहिताच्या कार्यासाठी खर्च करावा, असे त्यांनी सांगितले.

# बदलत्या वातावरणामुळे चाकण भागात गहू उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त

**चाकण (दै. संध्या)**

गेल्या काही दिवसांपासून चाकण व परिसरात वातावरणात बदल होऊ लागल्याने बदलत्या वातावरणामुळे चाकण भागातील गहू उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. उन्हाचा चटका वाढल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यताही शेतकऱ्यांनी वर्तवली आहे.

उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत असल्याने याचा फटका रब्बी हंगामातील बहुतांशी पिकांना बसत आहे. यंदा समाधानकारक पाऊस झाल्यानंतर जमिनीला वेळेवर वापसा न आल्याने रब्बी हंगामातील बहुतेक पिकांची पेरणी उशिरा झाली होती. उशिरा पेरणी केलेल्या गहू हरभरा ज्वारी मका या पिकांमधील दाणे परिपक्व होण्यासाठी थंडीची आवश्यकता असताना उन्हाचा चटका वाढल्याने या पिकांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता येथील शेतकरी शिवाजी धाडगे व काजल धाडगे यांनी व्यक्त केली



आहे. चाकण पंचक्रोशीत मान्सून पूर्व पाऊस समाधानकारक पडला होता. त्यामुळे पंचक्रोशीतील चाकणसह नाणेकरवाडी, कडाचीवाडी, खराबवाडी, पठारवाडी, राक्षेवाडी, आगरवाडी, मेदनकरवाडी, काळुस, वाकी, रासे, भोसे, कुरुळी, शेलपिंपळगाव, वडगाव घेनंद आदी परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने विहिरी पाण्याने तुडुंब भरल्या. त्यामुळे चाकण भागातील ओढे आणि परिसरातील विहिरींमध्येही पाणी पातळी समाधानकारक होती. यामुळे चाकण भागात गहू पिकांचे पेरा क्षेत्र प्रचंड प्रमाणात वाढले आहे.

अचानक वाढलेल्या उष्णतेमुळे शेतकरी वर्गाला आपल्या पिकांची चिंता वाटू लागली आहे. कारण या उष्णतेच्या बदलाचा फायदा तसेच तोटा शेतकऱ्यांना होण्याची शक्यता आहे. अचानक वाढलेल्या उन्हामुळे गहू उत्पादक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होण्याची भीती शिवाजी धाडगे यांनी व्यक्त केली आहे. बदलत्या वातावरणाचा फटका आंबा, चिक्कू, द्राक्षे, रामफळ, सीताफळ आदी पिकांना बसण्याची शक्यता आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून पोषक अशी थंडी पडत होती. या थंडीमुळे पिके जमात आली होती पण आता

> "गहू व हरभरा या पिकास थंडीची प्रचंड आवश्यकता आहे. वाढणारी उष्णता गव्हाच्या पिकांसाठी धोकादायक असून उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. उष्णतेच्या बदलाचा फायदा तसा होणारा तोटाही शेतकऱ्यांना सहन करावा लागतो."
>
> **- शिवाजी धाडगे, शेतकरी, चाकण**

अचानक उन्हाचा चटका वाढल्याने गव्हाच्या पिकांना याचा फटका बसण्याची मोठी शक्यता आहे.

गेल्यावर्षी देखील उष्णतेच्या लाटांमुळे गव्हाच्या उत्पादनात घट झाली होती. याही वर्षी चाकण परिसरात तापमानात वाढ होत आहे. त्यामुळे गहू उत्पादक शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. मागील दोन-तीन महिन्यांपासून थंड असलेले वातावरण गहू पिकांसाठी योग्य असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले होते. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.

# "मी स्वमर्जीने गेले", तरुणीचा व्हिडिओ समोर आल्याने खळबळ

**इंदापूर (दै. संध्या)**

इंदापूर तालुक्यातील भिगवण परिसरातून एका तरुणीचे अपहरण झाल्याची घटना मंगळवारी रात्री घडली होती, मात्र आता या प्रकरणाला पूर्णपणे वेगळे वळण मिळाले आहे. संबंधित तरुणीने स्वतःचा एक व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केला असून, आपले अपहरण झाले नसून आपण स्वमर्जीने प्रियकरासोबत गेल्याचा खुलासा तिने केला आहे. यामुळे परिसरात मोठी चर्चा रंगली आहे. लग्नाची खरेदी करण्यासाठी आपल्या आई आणि भावासोबत गेलेल्या या तरुणीचे अपहरण दोन तरुणांनी केल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. आई आणि भावाच्या डोळ्यात तिखट टाकून जबरदस्तीने तरुणीला नेण्यात आल्याचे सांगण्यात येत होते. या घटनेनंतर अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत तपासाचे आदेश दिले होते. मात्र, तरुणीने व्हिडिओद्वारे दिलेल्या माहितीमुळे हे प्रकरण अपहरणाचे नसून प्रेमसंबंधातून घडल्याचे स्पष्ट झाले आहे. व्हिडिओमध्ये तरुणीने असे नमूद केले आहे की, तिचे संबंधित मुलासोबत गेल्या अनेक वर्षांपासून प्रेमसंबंध आहेत. त्या मुलाने तिच्यावर कोणतीही जबरदस्ती केली नसून ती स्वतःच्या मर्जीने त्याच्यासोबत निघून आली आहे. दरम्यान, पोलिसांच्या तांत्रिक तपासातही काही महत्त्वाचे धागेदोरे हाती लागले आहेत. गेल्या दीड महिन्यात या दोघांमध्ये अकरा वेळा संपर्क झाला असून, यात मुलाने तीन वेळा तर मुलीने आठ वेळा एसएमएसद्वारे संपर्क साधला आहे.

हे फोन कॉल्स प्रामुख्याने मध्यरात्री उशिरा झाले असून त्यांचे ड्युरेशन अवघे तीन ते पाच सेकंद इतकेच आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### तुळजाराम चतुरचंद कॉलेजमध्ये अभिनव पदवी अभ्यासक्रमाची सुरुवात

बारामती (दैनिक संध्या) : बारामती येथील तुळजाराम चतुरचंद कॉलेजमध्ये यावर्षीपासून बी.एस्सी (ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी) या अभिनव पदवी अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. हा महत्त्वाकांक्षी निर्णय घेणारे तुळजाराम चतुरचंद कॉलेज हे महाराष्ट्रातील पहिले स्वायत्त महाविद्यालय ठरले आहे. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय हे मागील 63 वर्षे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करीत असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांमधील एक नामांकित महाविद्यालय असून नुकतेच या महाविद्यालयाला नॅक समितीकडून सर्वोच्च श्रेणी प्राप्त झाली आहे. आयटी क्षेत्रात झपाट्याने वाढणाऱ्या तंत्रज्ञानाच्या संधी आणि रोजगाराच्या वाढत्या मागणी तसेच जगभरात डेटा सिक्युरिटीसाठी वाढत असलेली ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची मागणी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या हेतूने या २०२५ या शैक्षणिक वर्षामध्ये हा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. सध्या उद्योग क्षेत्रात असलेल्या गरजा आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांची टीम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे. विशेष म्हणजे, या अभ्यासक्रमात सर्व विद्यार्थ्यांना अ‍ॅप्रेंटिसशिपची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग अनुभव मिळणार आहे. विद्यार्थ्यांना देश-विदेशातील नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार (MoU) करण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे. या अभ्यासक्रमासाठी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थी तसेच डिप्लोमा धारक विद्यार्थी पात्र असणार आहेत. अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी +91 99751 75415 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाने केले आहे.

### पाण्याच्या थकबाकी प्रश्नासंबंधी पत्र पाठविणार

पुणे (दैनिक संध्या) : 'महापालिका व जलसंपदा हे दोन्हीही राज्य सरकारचेच विभाग आहेत. पाणी बिलाच्या थकबाकीवरून दोन्ही विभागांमध्ये अंतर पडले असून ते अयोग्य आहे. महापालिका आयुक्त व जलसंपदा विभागाशी बोलणे झाले आहे. याबरोबरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत मी पत्र पाठविणार आहे. दोन्ही विभागांनी आपापसात लढण्यापेक्षा एकत्र येऊन मार्ग काढला पाहीजे.' असे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष व खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी सांगितले. बारामती लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित कामांसह पुणे शहर व समाविष्ट गावांमधील प्रश्नांबाबत सुळे यांनी मंगळवारी महापालिका आयुक्त कार्यालयात आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेऊन प्रलंबित कामांचा आढावा घेतला. त्यानंतर सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

# महंमदवाडीतील भूसंपदान नक्की कोणासाठी?

**पुणे (दै. संध्या)**

रस्ता आणि मूलभूत सुविधा नसतानाही महंमदवाडी येथील सुमारे दोन एकर खासगी जागा पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ताब्यात घेण्यासाठी महापालिका प्रशासन आग्रही असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे याच परिसरात दहा एकर ईडब्ल्यूएस आरक्षणाची जमीन गेल्या ३८ वर्षांपासून प्रलंबित असताना सुमारे ५५ कोटी रुपयांच्या टीडीआर मूल्यासह खासगी जमीन संपादित करण्यामागे नेमका कोणाचा दबाव आहे, तसेच या जागेसाठी प्रशासनाला कशाची घाई झाली आहे. याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. तर दक्षता विभागानेही या भूसंपादनावर आक्षेप उपस्थित केले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. प्रशासकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित दोन एकर जागेबाबत सुरुवातीला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तोंडी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

# एनओसीसाठी १९३ अर्ज; स्वीकृत नगरसेवकपदासाठी महापालिकेत लगबग

**पुणे (दै. संध्या)**

महापालिकेत स्वीकृत नगरसेवकपदी वर्णी लावण्यासाठी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार फिल्डींग लावण्यात आली असून, आतापर्यंत सुमारे १९३ जणांनी ना हरकत प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्ज केले आहेत.





तर प्रशासनाकडून आतापर्यंत सुमारे १६३ जणांना एनओसी देण्यात आली आहे. महापालिकेत १० स्वीकृत नगरसेवक नेमले जाणार आहेत. त्यात, सर्वाधिक ७ सदस्य भाजपचे असून, दोन राष्ट्रवादीचे तर एक कॉंग्रेसचा असणार आहे. महापालिका निवडणुका झाल्यानंतर आता या महिन्यात महापौर तसेच स्थायी समितीसह सर्वच विशेष समिती सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर आता प्रशासनाकडून स्वीकृत सदस्य नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महापालिका आयुक्तांनी ही प्रक्रिया महापालिकेतील राजकीय पक्षांच्या गटनेत्यांशी चर्चा करून करायची आहे. ही नियुक्ती महापौर निवडीनंतर लगतच्या महिन्यातील मुख्यसभेत केली जाणार असल्याने मार्च २०२६ च्या मुख्यसभेत ही निवड केली जाणार आहे. त्यासाठी सर्वच राजकीय पक्षांकडून कार्यकर्त्यांकडून अर्ज भरून घेतले जात आहेत. स्वीकृत सदस्यांसाठीही महापालिकेच्या निवडून आलेल्या सदस्यांप्रमाणेच महापालिकेची कोणतीही देणी नसलेले ना हरकत प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. त्यासाठी पालिका प्रशासनाकडून ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्या अंतर्गत आतापर्यंत १६९ अर्ज प्राप्त झाले आहेत.





# ओबीसी विद्यार्थ्यांसाठी काम करता आले हे समाधानकारक : अतुल सावे

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कारांचे वितरण; चिंचवडमध्ये सोहळा संपन्न

**पिंपरी (दै. संध्या)**

ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मागील काही वर्षांत विविध उपक्रम राबवता आले, हे समाधानकारक असल्याची भावना ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केली. महात्मा जोतिबा फुले मंडळाच्या वतीने आयोजित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. हा कार्यक्रम चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात संपन्न झाला. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थान असलेल्या नायगावचे नामकरण लवकरच 'सावित्री नगर' करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. तसेच सावित्रीबाई स्मारक, सावता महाराज स्मारक आणि भिडे वाड्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी सांगितले. अतुल सावे म्हणाले, "मागील दोन वर्षांत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी सुमारे ६४ वसतिगृहे सुरू करण्यात आली. महाज्योतीच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांत ४२ विद्यार्थ्यांनी यूपीएससी आणि ५२ विद्यार्थ्यांनी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. विकासाच्या कामांसाठी शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून सर्वसामान्यांच्या समस्यांवर उपाय करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत."

कार्यक्रमाला खासदार श्रीरंग आप्पा बारणे, महापौर रवी लांडगे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, वसंत लोंढे, अपर्णा डोके, संगीता ताम्हाणे आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सूर्यकांत ज्ञानोबा भसे व मिराताई भसे यांना 'फुले दांपत्य पुरस्कार', देवई वाळुंजकर, हिराबाई भुजबळ, सुभद्रा अर्जुन म्हेत्रे यांना 'आदर्श माता' पुरस्कार, शकुंतला जगताप, कविता आल्हाट, वृषाली मरळ, रंजना कुदळे यांना 'समाजभूषण', मनिषा सुरेश गोरे यांना 'महिला भूषण', शिल्पा रोडगे यांना 'कार्यक्षम शिक्षण अधिकारी' पुरस्कार देण्यात आला.

तसेच ज्योत्स्ना भुजबळ, सीमा शिंदे, सुनिता शिंदे, स्मिता बनकर यांना 'आदर्श शिक्षिका', डॉ. ऋतुजा जगताप व हर्षा औटी यांना 'कला भूषण', संगिता टिळेकर यांना 'कृषी रत्नभूषण', डॉ. शुभांगी म्हेत्रे यांना 'रखमाबाई राऊत वैद्यकीय भूषण', डॉ. दिपाली देशमुख यांना 'वैद्यकीय भूषण', सायरा शिकलगार यांना 'फातिमा सावित्री पुरस्कार', सोनिया राजगिरे यांना 'उद्योग भूषण', मिना माळी यांना 'आदर्श सरपंच' आणि श्रद्धा सावर्डेकर यांना 'अध्यात्म भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

> कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मंडळाचे प्रशांत डोके, सूर्यकांत ताम्हाणे, अनिल साळुंके, महादेव भुजबळ, निलेश डोके, नितीन ताजणे, वैजनाथ माळी, विलास शेंडे, नरहरी शेवते, किशोर माळी, निखिल यादव, अजित भोसले, शिवम बर्के, पोपट ताजणे, प्रदीप दर्शले, अमर ताजणे, अनिता ताठे, उर्मिला भुजबळ, आशा माळी, वृषाली ताजणे, कुंदा यादव, स्मिता माळी, शारदा राऊत, पूजा साळुंके, हर्षद भुजबळ, श्रीहरी हरळे, प्रकाश गोरे, नवनाथ कुदळे, कौशल माळी, परेश ताम्हाणे, रमेश गायकवाड, अशोक टिळेकर, ओंकार भोसले, दिलीप भोसले, किरण राऊत, सोहम भुजबळ आदींनी विशेष परिश्रम घेतले. जयकुमार गोरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, नायगावचे नामकरण, सावित्रीबाई व सावता महाराज स्मारक उभारणी तसेच भिडे वाड्याचे काम पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सर्वांना सोबत घेऊन विकास करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दृष्टिकोन असल्याचे त्यांनी नमूद केले.